रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ ◆ अंक ३४८
www.ramprahar.com

शनिवार ५ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

महावितरणची पाताळगंगा औद्योगिक संघटनेसोबत बैठक/२
नेरळजवळ अपघातात पतीचा मृत्यू, पत्नी गंभीर जखमी/५
बुद्धिबळपटू गुकेशकडून कार्लसनचे गर्वहरण/८

## पंतप्रधान मोदी 'ऑर्डर ऑफ द रिपब्लिक'ने सन्मानित



**पोर्ट ऑफ स्पेन :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे त्रिनिदाद आणि टोबॅगो या देशात जोरदार स्वागत झाले. या ठिकाणी त्यांना द ऑर्डर ऑफ द रिपब्लिक ऑफ त्रिनिदाद आणि टोबॅगो हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्यात आला. या वेळी देशाच्या पंतप्रधान कमला प्रसाद बिसेसर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. मोदी हे जगातील सन्मानीय, प्रशंसनीय आणि दूरदर्शी नेते असून त्यांनी जगातिक मंचावर भारताला शक्तीशाली देश केल्याचे बिसेसर यांनी सांगितले. त्यांनी चार वर्षांपूर्वी कोविड-१९ महामारीच्या काळाची आठवण करत भारताचे आभार मानले. त्या वेळी जग अनिश्चिततेच्या गर्तेत होते. आमच्यासारख्या छोट्या देशाची तर गोष्टच वेगळी होती, पण मोदी सरकारने आम्हाला कोविड लस पाठवली. ही केवळ कुटनीती नव्हती, तर आमच्याविषयीचा त्यांचा बंधूभाव, प्रेम आणि मानवता दिसून आली, असे त्या म्हणाल्या.

# शूरवीरांनी स्वराज्याची ज्योत तेवत ठेवली

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे पुण्यात प्रतिपादन

**पुणे : प्रतिनिधी**

महान भारताची रचना ही शिवछत्रपतींची प्रेरणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर धर्मवीर संभाजी महाराज, वीर ताराराणी, संताजी-धनाजी आदी अनेक वीरांनी स्वराज्याची ज्योत विझू दिली नाही. त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ आणि मग पहिल्या बाजीरावांची पेशवा म्हणून नेमणूक केल्यावर त्यांनी स्वराज्याची ज्योत तेवत ठेवली, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी (दि. ४) येथे केले.



**थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याचे अनावरण**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) परिसरातील त्रिशक्ती गेट येथे उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमात ना. शाह बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले. जनरल धीरज शेठ, एनडीएचे कमांडंट व्हाईस ॲडमिरल गुरचरण सिंग, खासदार मेधा कुलकर्णी, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

### आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांचा तारांकित प्रश्न

# एमपीएससी उत्तीर्ण उमेदवारांच्या नियुक्त्यांसाठी वेधले शासनाचे लक्ष

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती मिळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला आणि या विषयावर शासनाचे लक्ष वेधले.

राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) अराजपत्रित गट 'ब' व गट क लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेद्वारे ७००६ पदे भरण्यात येणार होती, मात्र पात्र उमेदवारांची संख्या भरपूर असूनही १६ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या यादीत फक्त ६६१३ उमेदवारांचीच निवड करण्यात आली असून शासनाच्या विविध विभागांतील ३९३ पदे रिक्त असल्यामुळे लिपिक वर्गाच्या कमतरतेमुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. निवड रद्द केलेल्या उमेदवारांची यादी २४ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध करूनही त्यानंतर रिक्त जागांसाठी अद्याप पर्यायी निवड यादी प्रसिद्ध करण्यात आलेली नसल्याने अनेक पात्र उमेदवारांची संधी वाया गेली असून संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे तसेच राज्य लोकसेवा आयोगामार्फत जानेवारी २०२३मध्ये कर सहायक या पदावरील ४६८ उमेदवारांना व राज्य उत्पादन शुल्काची पाच पदे असून त्यांनाही अद्याप नियुक्ती मिळाली नसून तांत्रिक सहाय्यक-१ पद असून याचा निकालच प्रलंबित असल्याने अशा ८,१७० पदांची नियुक्ती प्रलंबित आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.



विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, १६ एप्रिल २०२५ रोजी आयोगाने लिपिक-टंकलेखक संवर्गाची अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली नसून नियुक्ती प्राधिकारीनिहाय स्वतंत्र तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार ६६०० उमेदवार शिफारसपात्र ठरले आहेत. आयोगाने लिपिक-टंकलेखक संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी ११ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करून उमेदवारांकडून नियुक्ती प्राधिकारीनिहाय पसंतीक्रम मागविला. उमेदवारांच्या पसंतीक्रमानुसार २७८ नियुक्ती प्राधिकारीनिहाय स्वतंत्र तात्पुरत्या निवड याद्या १६ एप्रिल २०२५ रोजी प्रसिध्द केल्या. त्यानंतर आयोगाने उमेदवारांकडून Opting Outचा विकल्प मागविण्यात आला असता ६७१ उमेदवारांनी Opting Outचा विकल्प निवडला. त्यानुसार अंतिम निकाल जाहीर करण्याची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरू आहे.

कर सहायक या संवर्गासाठी विज्ञापित केलेल्या ४६८ पदांपैकी आयोगाने शिफारसपात्र ठरलेल्या ४६५ उमेदवारांची मार्च २०२५मध्ये वित्त विभागास शिफारस केली. त्यापैकी १८५ उमेदवारांना मे २०२५मध्ये नियुक्ती आदेश देण्यात आले असून उर्वरित उमेदवारांचा प्रमाणपत्र पडताळणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित नियुक्ती आदेश देण्यात येतील. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गासाठी विज्ञापित केलेल्या सहा पदांसाठी आयोगाने सहा उमेदवारांची एप्रिल २०२४मध्ये गृह विभागास शिफारस केली. त्यापैकी एक उमेदवार कागदपत्र पडताळणीस गैरहजर होता व दोन उमेदवार पडताळणीअंती अपात्र ठरले. उर्वरित तीन उमेदवार पात्र ठरल्याने त्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले. त्यानंतर गृह विभागाने मागणी केल्यानुसार आयोगाने प्रतिक्षायादीतून तीन उमेदवारांची शिफारस मे २०२५मध्ये केली. या तीन उमेदवारांची कागदपत्र/प्रमाणपत्र व शारिरीक पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित नियुक्ती आदेश देण्यात येतील. तांत्रिक सहाय्यक या संवर्गासाठी शिफारस केलेल्या एका पदावर ११ सप्टेंबर २०२४च्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे.

## भाषेच्या नावाखाली गुंडगिरी खपवून घेणार नाही -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी भाषेचा अभिमान असणे चुकीचे नाही. आम्हालाही मराठी भाषा प्रिय आहे, पण भाषेच्या नावाखाली गुंडगिरी खपवून घेणार नाही. भाषेवरून वाद घालणाऱ्या, मारहाण करणाऱ्या गुंडशाहीवर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

मनसे कार्यकर्त्यांनी २९ जूनच्या रात्री मराठी भाषा न बोलल्याच्या कारणावरून मीरा-भाईंदरमध्ये जोधपूर स्वीट्स अँड फरसाणचे मालक बाबूलाल चौधरी यांना मारहाण केली होती. यानंतर तेथे तणावाचे वातावरण निर्माण झाले. व्यापाऱ्याला मारहाण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एखादा मराठी व्यापारी आसाममध्ये जाऊन भाषा शिकायला वेळ लागत असेल तर त्याला मारहाण करणार का? खरा अभिमान असेल तर मराठी भाषा शिकवा, क्लासेस घ्या, इंग्रजीला का मग गळे लावता. स्वत:च्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकायचे आणि मराठीसाठी गळा काढायचा, असे म्हणत त्यांनी ठाकरे बंधूंवर अप्रत्यक्षपणे टीका केली.





**केडियांचे वक्तव्य चुकीचे!**

सुशील केडिया आणि मनसे वादावरही मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली. मराठी येत नसेल तर ठीक, पण तरी मराठी येत नाही, मी मराठी शिकणार नाही हे अत्यंत उद्दामपणे सांगणे चुकीचे नाही का? याचे समर्थन कसे होऊ शकते, असे म्हणत त्यांनी या वेळी केडियांना फटकारले.

## कामरा, अंधारेंविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या नया भारत या कॉमेडी शोमधून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक टीका केली होती, तर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारेंनीही व्हिडीओ बनवला होता. त्यामुळे या दोघांविरुद्ध हक्कभंग दाखल करण्यात आला होता. त्यास मंजुरी देण्यात आली आहे.

विधान परिषदेचे सदस्य प्रवीण दरेकर यांनी गेल्या विधीमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. आता हक्कभंग मंजूर झाला आहे. त्यानुसार कामरा आणि अंधारेंना नोटीस काढली जाणार असल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

## निवडक

### हिमाचलमध्ये अतिवृष्टीमुळे ६३ जणांचा मृत्यू, ४० बेपत्ता

**मंडी :** हिमाचल प्रदेशमध्ये भूस्खलन, ढगफुटी आणि अचानक आलेल्या पुरामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक आपत्तींमुळे आतापर्यंत किमान ६३ जणांचा मृत्यू झाला असून ४०हून अधिक लोक बेपत्ता असल्याची माहिती प्रशासनाने दिली. सर्वात जास्त नुकसान मंडी जिल्ह्यात झाले असून राज्यात ७ जुलैपर्यंत सर्व जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

### कोंढव्यातील बलात्कार प्रकरणात आता वेगळीच माहिती समोर

**पुणे :** कोंढाव येथील उच्चभ्रू सोसायटीतील सदनिकेत शिरून तरुणीवर झालेल्या बलात्कार प्रकरणात वेगळीच माहिती समोर आली आहे. ताब्यात घेतलेल्या संशयित व्यक्तीने सदनिकेत बळजबरीने प्रवेश केला नव्हता किंवा त्याने पीडितेच्या चेहऱ्यावर कोणताही स्प्रे मारला नसल्याचे समोर आले आहे तसेच तक्रारदार तरुणीने सेल्फीबाबत जी माहिती दिली, तोही संमतीने काढला असल्याचे पोलिसांनी सांगितले. अशा रितीने तरुणीनेच खोटी फिर्याद तयार केल्याचे तपासातून पुढे आले असून अधिक तपास सुरू आहे.

## अलिबागमध्ये ऑफिस पार्टीसाठी आलेल्या महिलेवर बलात्कार

### सहकारी कर्मचाऱ्याला अटक; कोठडीत रवानगी



**अलिबाग : प्रतिनिधी**

कंपनीच्या ऑफिस पार्टीसाठी अलिबागमध्ये आलेल्या एका महिलेवर सहकारी कर्मचाऱ्याने बलात्कार केल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी अभिषेक सावडेकर (वय २५, रा. कोपरखैरणे, नवी मुंबई) याला अटक केली असून त्याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

संबंधित कंपनीतील १४ कर्मचारी अलिबाग तालुक्यातील मुशेत येथील अलास्का व्हिलात पार्टीसाठी आले होते. सायंकाळी मद्यपान सुरू असताना पीडित महिला कार्यालयीन कामानिमित्त आधी थांबली होती. काम पूर्ण केल्यानंतर रात्री तीही पार्टीत सहभागी झाली.

दारूच्या नशेत ती व्हिलामधील जलतरण तलावाजवळ झोपली होती. तिच्या काही सहकाऱ्यांनी तिला उचलून बेडरूममध्ये झोपवले. त्यानंतर पहाटे १ जुलै रोजी ३च्या सुमारास तिला कोणीतरी जबरदस्ती करत असल्याची जाणीव झाली. जाग येताच तिने पाहिले असता अभिषेक सावडेकर हा तिच्या रूममधून बाहेर पडताना दिसला.

या संदर्भात पीडित महिलेने अभिषेककडे चौकशी केली असता त्याने रूम बंद करुन घेतली. सकाळी ११ वाजता पुन्हा विचारणा केली असता, त्याने घाबरून माफी मागितली. या प्रकरणी पीडित महिला कर्मचाऱ्याने अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर, अभिषेकवर बलात्काराचा गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## उद्घाटन





**पनवेल : चंदूकाका सराफ सुवर्णपेढीच्या पनवेल शहरातील भव्य दालनाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि अभिनेत्री सायली संजीव यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाले. या समारंभास कामगार नेते महेंद्र घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, प्रिती जॉर्ज, नीता माळी, सारिका भगत तसेच संजय जैन, विलास कोठारी, चंदूकाका सराफचे किशोर कुमार, जिनदत्त शहा, नेहा शहा, सम्यक शहा आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.**

# पावसाळ्यात पारंपरिक पेरा मासेमारीची लगबग

### मासळीला बाजारपेठेत मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील पावसाळ्याच्या आगमनानंतर मोठ्या होड्यांवरील खोल समुद्रातील मासेमारी थांबलेली असली तरी किनाऱ्यावर पारंपरिक पद्धतीने पेरा ओढून मासेमारी करण्याची रंगत वाढली आहे. समुद्र खवळलेला असताना हीच पारंपरिक पेरा मासेमारी कोळी बांधवांसाठी जगण्याचा आधार ठरतेय.

पावसाळ्यात समुद्रात मोठ्या लाटा उसळतात आणि हवामान अस्थिर होते. त्यामुळे यांत्रिक नौका घेऊन खोल पाण्यात मासेमारी करणे धोकादायक बनते. अशावेळी कोळी बांधव किनाऱ्यालगतची मासेमारीच सुरक्षित पर्याय मानतात. यासाठी आठ-दहा जणांची टीम तयार होते. मोठे जाळे समुद्रात फेकले जाते आणि नंतर शेकडो फूट लांब असलेला पेरा किनाऱ्यावर एकत्र ओढून आणला जातो.

ही प्रक्रिया केवळ कष्टप्रद नाही तर कौशल्याची आणि एकजुटीचीही आहे. किनाऱ्यावर सर्वजण मिळून सामूहिकरित्या काम करतात. पावसाळ्यात समुद्र खवळल्याने अनेक प्रजातीचे छोटे मासे किनाऱ्यावर येतात. पेरा ओढताना बोईट, भादवी, रेणवी, करकटे, खेकडे अशा लहान पण अत्यंत चविष्ट मासळी मोठ्या प्रमाणात मिळते.

या ताज्या मासळीला बाजारपेठेत मोठी मागणी आहे. स्थानिक लोक, हॉटेल्स आणि पर्यटक खासकरून पावसाळ्यात मिळणाऱ्या या मासळीला पसंती देतात. त्यामुळे दररोज सकाळ-संध्याकाळ पेरा ओढून मिळालेली मासळी लगेच खपते.

एक स्थानिक कोळी बांधव सांगतात, पावसाळ्यात खोल समुद्रात जाणे शक्य नसते. अशावेळी पेरा ओढून थोडेफार मासे मिळतात आणि घरखर्चाला हातभार लागतो.



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्ष पदार्पणानिमित्त रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वर्षात पदार्पण अर्थात अमृत महोत्सव वर्षानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रक्तदान शिबिर घेण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी हा विशेष रक्तदान उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या रविवारी आषाढी एकादशी असल्याने आता हे शिबिर १३ जुलै रोजी खारघर येथे होणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदापर्णानिमिताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून विशेषतः थॅलेसिमियाग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. ६ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याने अनेक भक्तगण पंढरपूरच्या वारीला जात आहे. त्यामुळे या दिवशी आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबीर पुढील रविवारी होणार आहे, अशी माहिती खारघर युवा मोर्चाचे अध्यक्ष नितेश पाटील यांनी दिली.



**१३ जुलैला खारघरमध्ये उपक्रम**

## आषाढी एकादशीला करंजाडे नोडमध्ये मटण, मच्छी व दारू दुकाने राहणार बंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलजवळील करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत रविवारी (दि. ६) आषाढी एकादशीच्या दिवशी चिकन, मटण, मच्छी व दारूची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश सरपंच मंगेश शेलार यांनी दिले आहेत.


आषाढी वारी महाराष्ट्राची धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा असून महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल-रुख्मिणीच्या दर्शनासाठी असंख्य लोक पंढरपूरला जातात. हजारो वारकरी तर वारीत पायी सहभागी होऊन भजन, कीर्तन व नामस्मरण करीत जात असतात.

आषाढी एकादशी या वर्षी रविवारी, ६ जुलै रोजी आहे. धार्मिक दृष्टिकोनातून या दिवसाला महत्त्व असल्याने करंजाडे नोडमधील सर्व चिकन, मटण, मच्छी व दारू विक्रेत्यांनी आपली दुकाने बंद ठेवावीत, असे आदेश सरपंच मंगेश शेलार यांनी दिले आहेत.

# ‘पनवेल मनपा हद्दीतील गृहनिर्माण सोसायट्यांच्या पुनर्विकासासाठी सिडकोची सकारात्मक भूमिका’

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सेक्टर एक ते अकरा क्रमांकाच्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या पुनर्विकासाबाबत शासन सकारात्मक आहे. संबंधित सोसायट्यांनी पूर्वी बंगल्यांसाठी अथवा रो हाऊससाठी मिळालेल्या प्लॉटवर बहुमजली इमारती उभारल्या आणि त्यामधील सदनिकांची विक्री केली. त्यानंतर सिडकोने अशा इमारती नियमित करण्यासाठी धोरण आणले असून काही प्रकरणे याअंतर्गत नियमितही करण्यात आली असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.



सदस्य विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. या वेळी सदस्य सर्वश्री भाई जगताप, प्रवीण दरेकर, सचिन अहिर यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

मंत्री सामंत म्हणाले की, १०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या मर्यादेपर्यंतच नियमितीकरण शक्य होते. यापुढे सेक्टर एक ते अकरा क्रमांकातील इमारतींमध्ये जे नियमबाह्य बांधकाम झाले. त्याचे न्यायालयीन निर्णयानंतर सकारात्मक निकाल लागले असून सिडको या संदर्भात सकारात्मक कारवाई करणार आहे. काही सोसायट्यांमध्ये राहिल्या असल्यास त्यांनादेखील संधी मिळावी यासाठी ९० दिवसांची अतिरिक्त मुदत देण्यात येणार आहे. ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, अशा संस्थांना या कालावधीत आपल्या योजना सिडकोकडे सादर करता येतील. अशा सर्व प्रकरणांमध्ये न्याय्य निर्णय घेण्याची जबाबदारी सिडको पार पाडेल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

'अधिराज कॅपिटल' या इमारतीसंदर्भातील तक्रारींवरही मंत्री सामंत यांनी उत्तर दिले. हा विषय गंभीर असून बांधकाम कसे झाले, कोण जबाबदार आहेत याची चौकशी केली जाईल. दोषी अधिकारी सापडल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे पाण्याचा अभाव, लिफ्टची अडचण या समस्या गंभीर असून सिडकोचे वरिष्ठ अधिकारी पुढील आठवड्यात त्या परिसराला भेट देतील आणि लोकांशी संवाद साधून अडचणी सोडवण्यासाठी कालबद्ध उपाययोजना करतील. संबंधित अहवाल अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात सादर केला जाईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

मंत्री सामंत यांनी डबल टॅक्सेशनचा मुद्दादेखील मान्य करत सांगितले की, एमआयडीसी आणि सिडको क्षेत्रांमध्ये महापालिकेकडून तसेच सिडकोकडून कर आकारणी होत आहे, ही बाब चुकीची आहे. यासाठी नगरविकास विभाग आणि सिडको यांनी एकत्र बसून ठोस धोरण तयार करावे लागेल. राज्याचे उपमुख्यमंत्री व नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात बैठक घेण्यात येईल. सिडकोमार्फत अशा क्लस्टर योजनांची अंमलबजावणी केली जात असल्याचे या वेळी मंत्री सामंत यांनी सांगितले.

## टेम्पोच्या धडकेत रेल्वेचे नेरळपाडा गेट तुटले

**नेरळ : प्रतिनिधी**



मध्य रेल्वेच्या कर्जत रेल्वे मार्गावरील नेरळ पाडा गेट भारत गॅस वाहतूक करणाऱ्या टेम्पोच्या धडकेने तुटले आहे.त्यामुळे फाटकातून होणारी वाहनांची वाहतूक रोखण्यात आली असून वाहतूक कोंडी झाली आहे.दरम्यान टेम्पो चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

नेरळ कळंब या राज्य मार्गावरील असणारे नेरळ जॅक्सन येथील नेरळ पाडा गेट स्वयंचलित आहे.या राज्यमार्गावर नेहमीच वाहनांची वर्दळ असल्याने येथे रेल्वे ट्रेन येण्याच्या वेळात हा गेट बंद करण्यात येते.दरम्यान शुक्रवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास भारत गॅस या गॅस सिलेंडर टाक्यांची वाहतूक करीत असणाऱ्या टेम्पो चालकाने नेरळ बाजारपेठेच्या दिशेने येत असताना येणाऱ्या ट्रेनच्या वेळेत गेट बंद होत असताना आपले वाहन गेट मधून पळवण्याचा प्रयत्न केला असता टेम्पोची वरील कॅरियल ही स्वयंचलित गेटला धडकली.यामध्ये लोखंडी गेटचे नुकसान झाले असून ते बंद होत नसल्याने,पर्यायी मार्ग करून गेट बंद करण्यात आला.

या घटनेने कर्जत मुंबई अप डाऊन मार्गावरील ट्रेनला सिग्नल न मिळाल्याने मध्य रेल्वेवर परिणाम झाला शिवाय येथील राज्यमार्गावरील पूर्व पश्चिम दिशेला वाहनांची वाहतूक रोखून धरण्यात आली असून लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

## माथेरानमध्ये शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप

**माथेरान : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांच्या विशेष प्रयत्नातून बेस्ट शिव हनुमान मंदिर ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या माध्यमातून येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषद प्राथमिक शाळा,प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर आणि सेंट झेविअर हायस्कुल या तिन्ही शाळांच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम दि.२ जुलै रोजी आयोजित करण्यात आला.



बेस्ट शिव हनुमान मंदिर ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या माध्यमातून येथे एकूण शंभर डझन वह्या प्राप्त झाल्या होत्या. माथेरान भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहरात विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात.या मध्ये आरोग्य शिबीर,दिव्यांगांना मदत कार्य,गणेश पूजन साहित्य वाटप,महिलांसाठी सॅनेटरी नॅपकिन वाटप अश्या विविध कार्यक्रमांचे आयोजन माथेरान भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात येते.

यावेळी भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ,माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव,शहर उपाध्यक्ष शुभाष भोसले, शैलेश चाफेरकर, विजाराम चौधरी, अमोधन तामिळ, महिला आघाडीच्या सुहासिनी शिंदे यांसह भाजपचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होतेगावातील सर्वसामान्य गरजवंत नागरिकांसाठी,शालेय विद्यार्थ्यांसाठी नेहमीच सहकार्याची भूमिका भाजपच्या वतीने पार पाडली जात आहे. सर्व विद्यार्थ्यांना वह्या मिळाल्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा ज्योती शिंदे, मुख्याध्यापक दिलीप आहिरे, लक्ष्मण ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम, निकीता चव्हाण, मनिषा चौधरी, माधुरी चौधरी आदी शिक्षक उपस्थित होते.

## उत्तम अभिनयासाठी पाच वास्तूपाठ अंगीकारणे आवश्यक –ज्योती आर्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उत्तम अभिनयासाठी अभिनयाचे पाच वस्तुपाठ म्हणजेच (पाच डब्ल्यू) कधी, कुठे, काय, कोणाला आणि का अंगीकारणे आवश्यक असल्याचे प्रशिक्षक तथा अभिनेत्री ज्योती आर्या यांनी खारघर येथे सांगितले.



पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे व नाट्य परिषद शाखा पनवेलचे उपाध्यक्ष परेश शेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबीर खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरात अभिनय या विषयावर त्या बोलत होत्या. शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना ज्योती आर्यांनी सांगितले,सकस अभिनयासाठी अभिनेत्याने त्याला दिलेल्या भूमिकेचे सादरीकरण करण्याच्या तयारीमध्ये पात्राचे चरित्र चित्रण अत्यंत महत्वाचे आहे आणि त्यासाठी त्याने कधी, कुठे, काय, कोणाला आणि का हे प्रश्न विचारणे गरजेचे आहे.यावेळी त्यांनी काही प्रात्यक्षिकही करून घेतली.यावेळी पनवेल महानगरपालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, स्मिता गांधी, उपस्थित होते.

## कर्जत तहसीलदारांच्या हस्तक्षेपानंतर शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरवरील कारवाई शिथिल

**कर्जत : प्रतिनिधी**

सध्या शेतीची कामे जोरात सुरु आहेत. या कामांसाठी हल्ली शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करीत आहे. परिवहन विभागाकडून ट्रॅक्टरवर कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना शेतीची मशागत करता येत नाही. ही कारवाई आरटीओंनी थांबावी असे निवेदन किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांनी तहसीलदारांना निवेदन दिले. तहसीलदारांनी त्याची लगेच दखल घेऊन कारवाई थांबण्याच्या सूचना दिल्याने शेतकरीवर्गाला दिलासा मिळाला आहे.



यंदा पाऊस लवकर सुरु झाल्याने शेतकरी वर्ग गोंधळात सापडला असताना शेतीच्या मशागतीसाठी लागणाऱ्या ट्रॅक्टर वर पनवेलला विभागीय परिवहन कार्यालयाकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे. याप्रकारमुळे शेतकरी वर्गाला शेतीच्या मशागतीचे काम करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली.

ही बाब किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांनी किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, तालुकाध्यक्ष शिरीष कदम, सूर्यकांत गुप्ता, श्रीनिवास राव, युवा मोर्चा शहराध्यक्ष सर्वेश गोगटे यांच्यासह तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांची भेट घेऊन परिवहन विभागाने ट्रॅक्टरवरील कारवाई थांबावी.

यासाठी निवेदन दिले. तहसीलदार डॉ. जाधव यांनी तात्काळ परिवहन विभागाला कारवाई थांबण्याच्या सूचना दिल्याने शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे.

## महावितरणसोबत पाताळगंगा येथील औद्योगिक संघटना सदस्यांची संयुक्त बैठक

**कल्याण : रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या नवनवीन उपक्रमाबाबत माहिती देण्यासाठी तसेच औद्योगिक संघटनांच्या वीज संबंधी समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी दिनांक १ जुलै रोजी महावितरण व पाताळगंगा येथील औद्योगिक ग्राहकांचे प्रतिनिधी एपीएमए (अतिरिक्त पाताळगंगा मॅन्युफॅक्चरिंग संघटना) व पीआरआयए (पाताळगंगा-रसायनी औद्योगिक संघटना) यांची संयुक्त बैठक संपन्न झाली.




या बैठकीत, महावितरण भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता, संजय पाटील, पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, कार्यकारी अभियंता, पनवेल (ग्रा.) विभाग, व्ही.एम.शिंदे मे. व्हीलाईट फर्निटेक, पाताळगंगा या कंपनीच्या दालनात संपन्न झाली.

यावेळी पाताळगंगा-रसायनी औद्योगिक क्षेत्रातील वीज ग्राहकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी चर्चा झाली.

महावितरणचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी अधिकाऱ्यांना देखभाल दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करून ग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीज पुरवठा करण्याच्या सूचना दिल्या. तसेच ग्राहकांचे ग्रुप तयार करून त्यांना एसएमएसद्वारे संवाद साधण्यास सांगितले.

रोहित्रे चोरी रोखण्यासाठी कंपन्यांनी त्यांचे सीसीटीव्ही चे कॅमेरे रोहीत्रांकडे वळवण्यासाठी सुचना केल्या. तसेच एमआयडीसी व महावितरणच्या अधिकाऱ्यांना समन्वय राखण्यास सांगितले.

एमआयडीसी व इतर विभागामार्फत कामाच्या दरम्यान भूमिगत वाहीन्यांना होणारे नुकसान टाळण्याकरिता समन्वय साधण्याचे निर्देश दिले व कॉल बिफोर यु डिग हे मोबाईल ॲप वापरण्याच्या सुचना अधिकाऱ्यांना दिल्या व आवश्यक तेथे वाढीव श्रमतेचे रोहित्रे बसविण्यास सांगितले.

यावेळी परमजीत सिंग सैनी, अध्यक्ष (एपीएमए), विनोदकुमार गोंड सचिव (एपीएमए), . डी. एस. गुरव, मुख्य कार्यकारी सचिव (पीआरएआय),. प्रसन्ना जोशी, अतुल राठोड, .प्रदीप कुऱ्हाडे, संजय अकोले, मीनल गाडगे-मोकल व इतर ग्राहक प्रतिनिधी उपस्थित होते.

**पान १ वरून**

## शूरवीरांनी स्वराज्याची ज्योत तेवत ठेवली

संपूर्ण विश्वात प्रत्येक क्षेत्रात आपला देश पुढे राहील हे आपले जीवन ध्येय असले पाहिजे यासाठीची प्रेरणा आणि ऊर्जा पहिले बाजीराव पेशवे यांच्या जीवनचरित्रातून मिळते, असे सांगून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, पहिल्या बाजीरावांनी तंजावर ते अफगाणिस्तानपर्यंत आणि अफगाणीस्तान ते बंगाल कटकपर्यंत मोठ्या हिंदवी साम्राज्याची स्थापना केली, जे छत्रपती शिवरायांचे स्वप्न होते. बाजीरावांनी युद्ध नियोजनातील वेग, रणकौशल्य, रणनीती आणि वीर सोबत्यांच्या साथीने अनेक पराभवांना विजयात रूपांतरीत केले. पालखेडच्या विजयाचा अभ्यास बारकाईने केल्यास हा अकल्पनीय होता हे लक्षात येईल. गुलामीचे निशाण उद्ध्वस्त करुन स्वातंत्र्याचा दीप लावण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले. देश-विदेशातील अनेक युद्धकौशल्यातील अभ्यासू सेनानींनी त्यांच्या युद्धकौशल्याविषयी गौरविले आहे. बाजीराव पेशवे यांनी त्यांच्या २० वर्षांच्या काळात मृत्यूपर्यंत लढलेली सर्व ४१ युद्धे जिंकली, असेही गौरवोद्गार ना. शाह यांनी काढले.

पहिले बाजीराव यांचे स्मारक बनविण्याची सर्वात उचित जागा कोणती असेल तर ती एनडीएच, कारण येथून देशाच्या तिन्ही सेनादलांचे प्रमुख अधिकारी प्रशिक्षित होऊन बाहेर पडत असतात. येथून बाहेर पडताना श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या जीवनकाळाचा अभ्यास करून जेव्हा भविष्यातील सेनानी जातील तेव्हा भारताच्या सीमांना स्पर्श करण्याचे धाडस कोणी करणार नाही. भविष्यात स्वराज्य टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागल्यास आपली सेना आणि नेतृत्व निश्चित करेल. ऑपरेशन सिंदूर हे याचे उदाहरण आहे, असेही ना. शाह यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी जिजाऊ माँसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली जनतेला एक करून मुघल साम्राज्याच्या चारही आक्रमकांना सळो की पळो करून सोडले. या प्रेरणेतून अनेक पराक्रमी योद्धे तयार झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या साम्राज्याला विस्तारित करण्याचा श्रीमंत बाजीराव पेशवे यांचा इतिहास आहे.

इंग्रजांनी आणि त्यानंतर काहींनी आपल्या इतिहासातील अनेक नायकांवर अन्याय केला आणि आपल्या हिंदवी स्वराज्याचा आणि मराठी साम्राज्याचा इतिहास त्यांनी आपल्या इतिहासातच विलीन करून टाकला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात या नायकांचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहचविण्याचा आता प्रयत्न सुरू आहे. विनय सहस्त्रबुद्धे यांनीही विचार मांडले. एअर मार्शल (नि.) भूषण गोखले यांनी प्रास्ताविक केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात इंटर्नशिप मुलाखत सत्र उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवार दिनांक ४ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट कमिटी आणि इंटरचॅम्प यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप मुलाखत सत्राचे यशस्वीरित्या आयोजन केले होते.



या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना इंटरचॅम्प कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांचे प्रोफाइल बारकाईने तपासून त्यांच्या सविस्तर मुलाखती घेतल्या. या सत्रातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इंटरचॅम्पकडून इंटर्नशिपची संधी मिळणार आहे. या उपक्रमात महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे तसेच महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकर यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. अर्पिता नायक समन्वयक, करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट कमिटी यांनी केले विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला .

**दुखवटा**

### पुष्पा (नानी) पिंगळे

**खालापूर : प्रतिनिधी**

पंचायत समिती माजी सदस्या ह.भ.प. पुष्पा (नानी) वसंत पिंगळे यांचे



अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७७ वर्षे होते. घोडवली येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात ३ मुलें मुलगी नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि. ०६/०७/२०२५ रोजी श्री क्षेत्र पुंडलिक मंदिर, धाकटी पंढरी, साजगांव येथे होणार असून उत्तरकार्य बुधवार दिनांक ९ जुलै रोजी घोडवली येथे होणार आहेत.

## निवडक

### अल्पवयीन तरुणीला पळवले



**पनवेल :** पनवेल शहरातील कोळीवाडा परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन तरुणीला अज्ञात इसमाने फुस लावुन पळवून नेल्याची घटना घडली आहे. स्वाती श्रीविलास निर्मल उंची ५ फुट ३ इंच, रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा सडपातळ, केस काळे, नाक–सरळ, डाव्या गालावर तिळ, अंगात–काळ्या रंगाची कुर्ती, काळ्या रंगाचा पायजमा, पायात काळ्या रंगाची पावसाळी चप्पल, भाषा मराठी हिंदी बोलणारी आहे . या तरुणीबाबत अधिक माहिती असेल त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांच्याशी संपर्क साधावा .

### रिलायन्स जिओ टॉवरमध्ये चोरी

**पनवेल :** परिसरातील देवद गांव, या ठिकाणी असलेल्या जीवो टॉवर या ठिकाणी एकूण ३.०५,६१७७/– रू. किमतीच्या साहित्याची चोरी झाली असल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत कंपनीमध्ये बीएमसी सुपरवाईझर म्हणून काम करणारे विश्वास मोरे यांनी चोरीची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दिली आहे.

### गुटखा विक्रीवर पोलिसांचा छापा

**पनवेल :** उलवा परिसरात एका पान टपरीवर महाराष्ट्र शासनाकडून प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू विक्रीसाठी केलेल्या साठ्यावर उलवा पोलिसांनी कारवाई करीत गुटखा ताब्यात घेतला. यावेळी गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली. यावेळी गुटखा विक्री करणारा रविंद्र रामहीत यादव यांच्यावर गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. नवी पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्फदर्शनाखाली उलवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन राजाने यांनी पोलीस पथकांच्या मार्फत उलवा परिसरात अमली पदार्थ विक्री, साठवून आदीच्या धडक कारवाई मोहीम हाती घेतली आहे.

### वेश्या व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला वावरत असल्याने त्या परिसरातील इमारतीमधील महिलांना नाहक त्रास होत होता . या संदर्भात त्या भागातील इमारतीमधील रहिवास्यांनी तक्रार सुद्धा पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली असता या तक्रारीची दखल पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी आज त्वरित तेथील दहा महिलांना ताब्यात घेऊन कारवाई केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार साधना पवार व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन त्या महिलांना ताब्यात घेत असताना दोघीजणींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला असता महिला पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर पुढील कारवाई केली आहे.

# बनावट पुराव्यांद्वारे आरटीई अंतर्गत प्रवेश; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

वास्तव्याच्या मूळ कागदपत्रांमध्ये फेरबदल करून बनावट वास्तव्याचे पुरावे तयार केले आणि पत्त्यावर राहत नसताना राहत असल्याचे भासवून आर टी ई प्रवेश अंतर्गत प्रवेश प्राप्त करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी २४ जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

चालू शैक्षणिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत ऑनलाइन प्रक्रिया पनवेल तालुक्यात राबविण्यात आली. यावेळी २४ पालकांनी शाळेच्या एक किलोमीटर अंतरामध्ये पत्त्यावर राहत नसताना त्या पत्त्यावर राहत असल्याबाबतचे खोटे वास्तव्याचे पुरावे सादर केले. या पालकांनी त्यांच्या पाल्याच्या प्रवेशासाठी सादर केलेल्या वास्तव्याच्या मूळ कागदपत्रांमध्ये फेरबदल केला आणि बनावट वास्तव्याचे पुरावे तयार केले.

याप्रकरणी गटशिक्षणाधिकारी पनवेल यांनी शहर पोलीस ठाण्यात २४ जणांविरोधात गुन्हा दाखल केला. अली हुसेन खान, मोहम्मद फारुख, जाधव विनोद विठ्ठल, गणेश कांबळे, राकेश कश्यप, दत्तात्रय टाले, विश्वास देवकांता रवींद्रल, किरण तानाजी पाटील, इमरान अजिज पटेल, मोहम्मद सलमान फैयाज खान, नवनाथ पाटील, योगेश सर्जे राव चिकणे, सोफी असिफ चांद साहब, लीलाराम उकर्मा चौधरी, विठ्ठल गोविंदराव पालेवाड, सागर जानकीराम सुतार, श्रीकांत सुरेश बागडे, देव अनुज अमरीश, अहमद अली इनामदार, फिरोज अन्सार शेख, पेंगरी अशांना प्रशांत, नदीम अजमखान, समाधान बाळू राजपूत, अब्दुल्ला रईस मिया शेख या पालकांवर गुन्हा दाखल झाला आहे

## पनवेल शहर पोलिसांनी आवळल्या मोबाईल चोराच्या मुसक्या



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे हद्दीत रेल्वे स्टेशन परिसरात पादचाऱ्यांचे मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्या कडून दोन मोबाईल फोन हस्तगत केले आहेत.

या परिसरात मोबाईल चोरीचे गुन्हे वाढल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि प्रवीण फडतरे, पोहवा तुषार बोरसे, पोहवा महेश पाटील, पोहवा संदेश म्हात्रे, पोहवा अमोल पाटील, पोना मिथुन भोसले, पोशी विशाल दुधे यांनी तांत्रिक तपास करून आरोपी मन्नान गुड्डु शेख या नमूद गुन्हेगारास शिताफीने ताब्यात घेवून त्याच्या कडून एकून ५५,००० रुपये किंमतीचे दोन मोबाईल फोन हस्तगत केलेले आहेत. पुढील तपास सपोनि प्रविण फडतरे हे करीत आहेत.

## खारघरच्या वासुदेव बळवंत फडके उद्यानात योगा शेड उभारण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सेक्टर १२ येथील वासुदेव बळवंत फडके उद्यानात सन २०२० पासून चिरतरुण योगा परिवार यांच्यामार्फत नियमित योग प्रशिक्षण सुरू आहे. प्रशिक्षित योग शिक्षक श्री. विवेक खिर्डेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सकाळी अनेक जेष्ठ नागरिक आरोग्यसंपन्न जीवनशैलीसाठी येथे योगाभ्यास करतात. या उपक्रमात महिला दिन, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, आंतरराष्ट्रीय योग दिन अशा विशेष दिवसांचे आयोजनही करण्यात येते, तसेच आयुर्वेदिक काढ्याचे मोफत वितरणही होते. सदर सेवा पूर्णपणे विनामूल्य असून, त्याचा मोठ्या प्रमाणात जेष्ठ नागरिकांना लाभ मिळत आहे. मात्र, पावसाळ्यात योग्य शेड नसल्याने योगाभ्यासात अडथळा निर्माण होतो व आरोग्यावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, सुमारे २००० चौरस फूट जागेत एक शेड उभारण्याची विनंती भाजपा जिल्हा चिटणीस श्री. ब्रिजेश पटेल आणि चिरतरुण योगा परिवाराचे अध्यक्ष श्री. शाम पाटील यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त श्री. मंगेश चितळे व माजी सभागृह नेते श्री. परेश ठाकूर यांच्याकडे सादर केली आहे. यासारख्या सकारात्मक आरोग्यवर्धक उपक्रमांसाठी पावसाळ्याच्या काळातही सलग सुविधा मिळावी यासाठी शेडची तातडीने उभारणी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



## महापालिकांच्या सर्व शाळांमध्ये बालसभा विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरखेल कान्होजी आंग्रे व स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये शुक्रवार (दि.४) रोजी विशेष बालसभेचे आयोजन करण्यात आले. आयुक्त. मंगेश चितळे व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात सरखेल कान्होजी आंग्रे आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून वंदनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी या महान व्यक्तींच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी कथा प्रभावीपणे सादर केल्या. या वक्तृत्व आणि कथाकथन स्पर्धेत सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांच्या प्रभावी सादरीकरणातून या महान व्यक्तिमत्त्वांचे विचार, कार्य व जीवनपट उलगडण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या महान व्यक्तींच्या आदर्शांपासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढवण्यास मदत झाली. महान व्यक्तींच्या स्मृती जपत त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न साधण्यात आला.



## श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळातर्फे देवीचापाडा शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळाच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील देवीचापाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना भाजपचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमतून दरावर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला जातो. त्यानुसारे देवीचापाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या वह्यांचे वाटप अरुणशेठ भगत यांच्यासह मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीश अंकुश पाटील, अशोक साळुंखे, काळूराम फडके, रामदास फडके, दशरथ फडके, चिटणीस आकाश फडके, शक्तीकेंद्र प्रमुख महेंद्र म्हात्रे, विजय म्हात्रे, विजय पाटील, केसरीनाथ म्हात्रे यांच्यासह इतर उपस्थित होते.

## फुंडे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळातर्फे वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक वर्ष २०२५–२६मध्ये श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे, उरण येथे इयत्ता पाचवी ते दहावी अखेरच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य साळुंखे, लेखनिक नवनीत ठाकूर व उपशिक्षक दिगंबर पाटील यांच्या प्रयत्नातून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुमारे ३००० वह्यांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे मैनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे दरवर्षी श्री.रामशेठ ठाकूर विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील विविध शाळेत मोफत वह्या वाटप करीत असतात. त्याचा लाभ फुंडे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी होत असतो.



विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य बी.बी साळुंखे, स्कूल कमिटीचे सदस्य सुरेश म्हात्रे, दिलीप तांडेल उपमुख्याध्यापिका थोरात, पर्यवेक्षिका बाबर आणि पाटील गुरुकुल प्रमुख म्हात्रे तसेच शिक्षकवृंदांचे हस्तो वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख पाटील एच.एन यांनी केले. विद्यालयाच्या वतीने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे व अरुणशेठ भगत यांचे आभार मानले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ऑनलाइन पर्यावरणपूरक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नेचर क्लब आणि वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील दिनांक ५ जून ते १० जून या दरम्यान विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन पर्यावरणपूरक उपक्रमाचे आयोजन केले होते.

या उपक्रमाचे उद्दिष्ट पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जनजागृती करणे हे होते. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला तसेच त्यांनी आपल्या घरामध्ये किंवा समाजामध्ये विविध पर्यावरणपूरक कृती केल्या, झाडे लावणे, प्लास्टिकचा पुनर्वापर, सेंद्रिय खत तयार करणे, वीज व पाण्याचा योग्य वापर इत्यादी व प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कृतीचे छायाचित्र घेऊन त्याला एक उपयुक्त शीर्षक देत आयोजकांकडे पाठवले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल



सजगता निर्माण झाली असून, त्यांचे सकारात्मक प्रतिसाद मिळाले तसेच नेचर क्लब आणि वनस्पतीशास्त्र विभागाने भविष्यात आणखी असे उपक्रम आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या पर्यावरणीय उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल नेचर क्लब व वनस्पतीशास्त्र विभाग तसेच या उपक्रमांमधील विजेत्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच नेचर क्लब व वनस्पती शास्त्रीय भागातील इतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## वृद्ध महिलेची फसवणूक; पोलीस ठाण्यात तक्रार

**पनवेल :** किसननगर ठाणे येथे राहणारी ८० वर्षीय महिला तिच्या मुलीला भेटण्यासाठी कामोठ्यात आली असताना अज्ञात चोरट्यांनी त्या महिलेची दिशाभूल करून हात चलाखीने तिच्या गळ्यातील सोने, पैश्याचे पाकीट असे फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याबाबत जयश्री यांनी कामोठे पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दिली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

जयश्री भगवान हुरसाळे, या भटवाडी वागळे इस्टेट, किसननगर नं. ३, येथे राहत असून जयश्री या कामोठे येथील पुरातन गणेश मंदिरात दर्शन घेऊन मुलींला भेटण्यासाठी सतलज रेसिडेन्सी, सेक्टर ३५, कामोठे येथे जाण्यासाठी पायी चालत निघाल्या. यावेळी दोन इसम यांनी थांबवून त्या अज्ञात चोरट्यांनी, एका मोठ्या माणसाच्या मुलाचा वाढदिवस आहे. गरीब महिलांना दोन हजार रुपये, साड्या, रेशन, चपला वाटत आहे, असे सांगत हात चालाखीने सोन्याची बोरमाळ तसेच पैशांचे पाकिट घेऊन चोरटे पसार झाले.

## नेरे उपसरपंचपदी भाजपचे राम पाटील बिनविरोध



**पनवेल : नेरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भारतीय जनता पक्षाचे राम पाटील यांची बिनविरोध निवड झाली. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरपंच सुनील पाटील, माजी सरपंच प्रकाश घाडगे, राजश्री म्हस्कर, एकनाथ पाटील, सुभाष पाटील, मेघनाथ पाटील, तेजस जाधव,मिलिंद पाटील, निलेश पाटील, माजी उपसरपंच नीलिमा पाटील, वंदना रोडपालकर, कल्पना वाघे, शैलेश जाधव, दिनेश मानकामे, भूपाळ मानकामे, किरण मानकाने, सुनील पाटील, संजय पाटील, बंटी पाटील, वामन केवारे, रोशन पाटील, वासुदेव गवते, बाळा चोरगे, दिलीप मगर, अथर्व पाटील, नामदेव पाटील, नारायण पाटील उपस्थित होते.**



**पनवेल : सतीश गायकवाड व पूजा गायकवाड यांनी चि. अथांगचा वाढदिवस शिरढोण येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालयात १०० गरीब व गरजू विद्यार्थ्यांना ६०० वह्यांचे वाटप करून साजरा करण्यात आला. या वेळी डॉ. सचिन सोनवणे, डॉ. स्वरांजली गायकवाड व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.**

## संपादकीय

# सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

पुण्यातील उच्चभ्रू वसाहतीत कथित डिलिव्हरी बॉयने एका तरुणीवर तिच्याच घरात घुसून बलात्कार केल्याचे उघडकीस आल्याने पुण्यातील महिलांची सुरक्षा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. ज्या पद्धतीने स्प्रेचा वापर करून आरोपीने तरुणीच्या घरात प्रवेश केला व तिच्यावर बळजबरी केली ते पाहता उच्चभ्रू सोसायट्यांमधील सुरक्षिततेविषयी मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

**कोलकात्यात एका लॉ कॉलेजमध्ये घडलेली बलात्काराची घटना चर्चेत असतानाच पुन्हा एकदा बलात्काराच्या गुन्ह्यासंदर्भात महाराष्ट्रातील पुणे चर्चेत आले आहे. काही महिन्यांपूर्वी पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकामधील बलात्कार प्रकरण गाजले होते. नोकरीपायी पुण्यात राहणारी तरुणी पहाटे बसस्थानकावर पोहोचली असता फसवणुकीने तिला आडबाजूच्या बसमध्ये नेऊन धमकावून तिच्यावर बलात्कार करण्यात आला होता. आता पुण्यातील आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या संगणक अभियंता तरुणीवर उच्चभ्रू वसाहतीतील फ्लॅटमध्ये बलात्कार झाला आहे. ही तरुणीही महाराष्ट्रातील अन्य छोट्या शहरातून नोकरीसाठी पुण्यात आली आहे. बुधवारी सायंकाळी ही धक्कादायक घटना घडली. आधी कुरिअर कंपनीकडून आल्याची बतावणी आरोपीने केली. तरुणीने सेफ्टी डोअरमधूनच त्याच्याशी संवाद साधला व आणलेले कुरिअर आपले नसल्याचे सांगून ते स्वीकारण्यास नकार दिला. तेव्हा त्याने तिला तसे लिहून स्वाक्षरी करण्यास सांगितले. तरुणीला बोलण्यात गुंतवून त्याने तिच्या चेहऱ्यावर स्प्रे मारला. स्प्रे मारताच तिचे डोळे जळजळले. त्यानंतर आरोपी फ्लॅटमध्ये शिरला व त्याने तरुणीला धमकावून तिच्यावर बलात्कार केला. पसार होण्यापूर्वी त्याने तिच्या मोबाइलमध्ये सेल्फी काढली व मी परत येईन असा संदेश मोबाइलमध्ये लिहिला. घडल्या प्रकाराने भयभीत झालेल्या तरुणीने आधी गावी असलेल्या आपल्या कुटुंबियांना या घटनेची माहिती दिली. तिच्या कुटुंबियांनी पोलिसांना फोन करून झाला प्रकार सांगितला. या घटनेमुळे स्वाभाविकच त्या परिसरात घबराट उडाली आहे. सोसायटीत सीसीटीव्ही व्यवस्था असून व गेटवर सुरक्षा रक्षक असूनही अशी घटना घडली आहे हे तेथील रहिवाश्यांना हादरवणारे आहे. वास्तविक अशाच स्वरुपाची सुरक्षा व्यवस्था बहुतेक सुखवस्तू वसाहतींमध्ये असते. त्याखेरीज काही ठिकाणी अधिक खबरदारी म्हणून सोबत पचाही वापर केला जातो. घटना घडली त्या वसाहतीत असे कुठलेही प्रवेशासाठीचे प वापरात नाही. सीसीटीव्ही फुटेजमध्ये घटना घडली त्या वेळेत कुणी सोसायटीत प्रवेश केल्याचे दिसत नाही अशी प्राथमिक माहिती आहे. मोबाइलमध्ये काढलेला फोटो आरोपीने क्रॉप केला आहे. त्यामुळे त्यात त्याच्या चेहऱ्याचा फक्त थोडाच भाग दिसतो आहे. त्याआधारे पोलिस संशयितांचा शोध घेत आहेत, परंतु शहरी भागांतील सोसायट्यांमधील सुरक्षितता किती तकलादू असू शकते हे या घटनेतून पुरते स्पष्ट झाले आहे. प्रत्येक गोष्ट घराच्या दारापर्यंत डिलिव्हरीसाठी मागवण्यातून आपण अनेकांपर्यंत आपले नाव, पत्ता, ओळख पोहोचवत असतो. त्यातून आपली वैयक्तिक माहिती असंख्य अनोळखी व्यक्तींपर्यंत जात असते. या घटनेतील तरुणी त्या फ्लॅटमध्ये आपल्या धाकट्या भावासोबत राहात होती. तिचा भाऊ गावी गेलेला असताना नेमकी ही घटना घडली आहे. म्हणजे बहुदा कुणीतरी नीट पाळत ठेवून ती एकटी असताना हे कृत्य केले असावे. आरोपी तिला आधीपासून ओळखत होता असा तपशीलही नंतर तपासात पोलिसांच्या हाती लागला आहे. एकंदरच शहरी भागांत एकटे राहणारे वयोवृद्ध, एकट्या-दुकट्या राहणाऱ्या स्त्रिया, लहान मुले यांच्या सुरक्षिततेविषयी अधिक गांभीर्याने विचार व्हायला हवा आहे.**

# श्रीवर्धन तालुक्याला स्थलांतराचे ग्रहण

खबरबात
संतोष चौकर

श्रीवर्धन तालुका हा पूर्वीपासूनच अतिशय निसर्गरम्य आहे तसेच या तालुक्याला ऐतिहासिक व पौराणिक महत्त्वदेखील आहे. तालुक्यात हरिहरेश्वर हे श्री हरिहरेश्वर, काळभैरवाचे प्राचीन मंदिर आहे. या ठिकाणाची ओळख दक्षिण काशी अशीदेखील केली जाते. या मंदिराची स्थापना अगस्ती मुनींनी केल्याचे पुराणामध्ये आढळून येते.

श्रीवर्धन शहर पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे जन्मस्थान म्हणून ओळखले जाते. बाळाजी विश्वनाथ आणि थोरले बाजीराव यांचा जन्म श्रीवर्धन शहरातच झालेला आहे. श्रीमंत पेशव्यांच्या या मूळ वास्तूमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून कोणाचेही लक्ष नव्हते. १९८०च्या दशकामध्ये तत्कालीन नगराध्यक्ष अनंतराव गोगटे यांनी पेशवे मंदिराचे सुशोभीकरण केले होते व पहिले पेशवे बालाजी विश्वनाथ यांचा पुतळा त्या ठिकाणी उभारला.

या पुतळ्याचा लोकार्पण सोहळा विधान परिषदेचे तत्कालीन सभापती जयंतराव टिळक यांच्या हस्ते झाला. पूर्वी ही वास्तू पेशवे कुटुंब यांच्या एका ट्रस्टच्या ताब्यात होती, परंतु कालांतराने ती श्रीवर्धन नगर परिषदेच्या ताब्यात आली. नगर परिषदेच्या ताब्यात आल्यानंतर या ठिकाणी आर्केस्ट्रा, नाटक यासारखे प्रकार होऊ लागले. त्या वेळी ट्रस्टने नगर परिषदेला संबंधित वास्तू देताना महिला व लहान मुले यांच्या संबंधित कार्यक्रम करावेत, असे स्पष्ट लेखी लिहून दिलेले असतानासुद्धा त्या ठिकाणी ऑर्केस्ट्रा, नाटक यासारखे प्रकार सुरू होते.

शहरातील काही इतिहासप्रेमी नागरिकांनी या प्रकाराला विरोध दर्शवल्यानंतर नगर परिषदेने ही वास्तू अशा कार्यक्रमांसाठी देणे बंद केले. आजमीतिला या वास्तूचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यात येत आहे. या कामाचे श्रेय लाटण्यासाठी कोणी कितीही ओरडत असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की, २०१७ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कामासाठी १९ कोटी रुपयांचा निधी तत्वतः मंजूर केला होता, परंतु त्यानंतर आलेल्या कोरोना महामारीमुळे हे काम रखडले होते.

श्रीवर्धन तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता तालुक्याला ५२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. दिघी ते बागमांडले अशा या समुद्र किनारपट्टीवर अनेक गावे आहेत, ज्यामध्ये दिवेआगरसारखेदेखील ऐतिहासिक गाव आहे. या ठिकाणी असलेली पुरातन मंदिरे शिलाहार राजाने बांधली असल्याचे सांगितले जाते. श्रीवर्धन, दिवेआगर तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्यापही सर्व सण, उत्सव अत्यंत पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात. श्रीवर्धन शहरातील वैशिष्ट्य म्हणजे आजही गणपती विसर्जनाची मिरवणूक टाळ मृदुंगासह भजन करीत काढण्यात येते.

एक बाजूला अथांग समुद्र, तर एक बाजूला हिरव्यागार झाडीने नटलेल्या डोंगरदऱ्या. तरीही या डोंगरदऱ्यांमध्ये मिळणारे बॉक्साइट हाच श्रीवर्धन तालुका उजाड करण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. बॉक्साइट उत्खननामुळे तालुक्यातील डोंगर अक्षरशः पोखरले जात आहेत. १९८० ते १९९० या कालावधीमध्ये तालुक्यामध्ये भातशेती हा शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय होता. भातशेतीनंतर त्याच शेतामध्ये नांगरणी करून वाल, मूग, उडीद, चवळी यांसारखी पिके घेतली जात होती, तर ज्या ठिकाणी पाण्याचे स्रोत आहेत अशा ठिकाणी भाजीचे मळेदेखील केले जात होते.

डोंगरमाथ्यावर नाचणी, वरी अशी पिके चांगली होत असत, परंतु दिवसेंदिवस शेतीचा न परवडणारा खर्च व मजुरांची कमतरता यामुळे बहुतांश गावातील नागरिकांनी शेती करणे सोडून दिले व आपल्या मुलाबाळांसह मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरांमध्ये नोकरी-धंदा शोधण्याचे काम सुरू केले. पूर्वी मुंबईसारख्या ठिकाणी स्थलांतरित झालेले लोक दूध विक्री किंवा घरकाम अशा प्रकारची कामे करत असत. त्यामुळे भात लागवडीच्या वेळी, लावणीच्या वेळी ते रजा घेऊन गावाकडे येऊन शेती करत असत.


आताची नवीन पिढी शिकलेली असल्यामुळे या तरुणाईला चांगल्या ठिकाणी नोकऱ्या आहेत. त्यामुळे गावी शेती असूनसुद्धा कोणीही शेती करण्यास धजावत नाही. एकेकाळी श्रीवर्धन व म्हसळे या तालुक्याच्या हद्दीवर असलेल्या जांभूळ या गावामध्ये जवळजवळ शंभर नांगर व बैल जोड्या होत्या, परंतु आज त्या गावामध्ये नांगर व बैलजोडी पहायला मिळत नाही. गावांमधील ९०% घरे बंद आहेत. फक्त गावामध्ये शिल्लक आहेत ते काही वृद्ध व्यक्ती. गणपती व होळी या सणांना सर्व चाकरमानी गावाकडे येतात. उत्सव साजरे करतात व पुन्हा आपल्या नोकरी धंद्यानिमित्त मुंबईकडे जातात. ही परिस्थिती श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील ८० टक्के गावांमध्ये पहायला मिळते.

राज्यकर्त्यांकडून या ठिकाणच्या स्थानिक नागरिकांना रोजगार मिळावा या दृष्टीने पर्यटनवाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत, पर्यटन वाढ करताना या ठिकाणांच्या स्थानिक नागरिकांची किती हॉटेल, रिसॉर्ट आहेत हे देखील पाहणे गरजेचे आहे, कारण या ठिकाणाची बहुतेक हॉटेल, रिसॉर्ट बाहेरच्या शहरातील माणसांनी येऊन तयार केलेली आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी कामासाठीदेखील बाहेरून माणसे आणण्याचे उद्योग त्या हॉटेल मालकांकडून केले जात आहेत. राज्यकर्त्यांनी या ठिकाणी खरोखरच स्थानिक नागरिक पर्यटनावर आधारित किती व्यवसाय करतात. याची एक माहिती गोळा करून त्यावर आधारित पुढील योजना ठरवाव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.

# हिंदुस्थानी शास्त्रीय गायक हजरत इनायत खान

हजरत इनायत खान सुफी पंथाचे प्रचारक व संगीतकार होते. हजरत इनायत खान हे टिपू सुलतानच्या वंशातले होते. ५ जुलै १८८२ रोजी त्यांचा जन्म झाला. हजरत इनायत खान हा सूफी संगीतकार हिंदुस्थानी संगीत घेऊन प्रथम इंग्लंड-अमेरिकेत पोचले ते होते १९१० साल. या गोष्टीला १००हून अधिक वर्षे झाली. त्या काळी हजरत इनायत खानचे सर्वत्र स्वागत झाले आणि कोलंबिया विद्यापीठात त्याचे वादनाचे कार्यक्रमही झाले.

हजरत इनायत खान हे १७ वर्षे अमेरिका आणि इंग्लंडमध्ये काम करत होते.या सतरा वर्षात त्यांनी अनेक लेख लिहिले जे पुढे 'दि सूफी मैसेज ऑफ हज़रत इनायत खान' या नावाने प्रकाशित झाले. लंडनमध्ये हजरत इनायत खान यांची भेट रविंद्रनाथ टागोर यांच्याशी झाली होती. रविंद्रनाथ यांनी आपल्या मित्रांकडे भेट हजरत इनायत खान यांची भेट एका बॅरिस्टर महात्मा गांधीशी घालून दिली. हजरत इनायत खान यांचे ५ फेब्रुवारी १९२७ रोजी निधन झाले.



ब्रिटिश गुप्तहेर नूर इनायत खान या हजरत इनायत खान यांच्या कन्या होत. हजरत इनायत खान यांनी अमेरिकेन नागरिक ओरा रे बेकर यांच्याशी लग्न केले होते. अमेरिकेत रामकृष्ण मिशनच्या आश्रमात त्या दोघांची भेट झाली होती. नूर इनायत खान यांचा जन्म जानेवारी १९१४मध्ये मॉस्कोत झाला. त्यांचे बालपण पॅरिसमध्ये गेले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने पॅरिसचा ताबा घेतला, तेव्हा नूरचे कुटुंब लंडनला स्थलांतरित झाले. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी ब्रिटिशांसाठी गुप्तहेर म्हणून काम केले होते. त्या लंडनहून पॅरिसला जाणाऱ्या पहिल्या महिला रेडिओ ऑपरेटर होत्या. तिथे त्यांनी मॅडेलेइन या गुप्त नावाने तीन महिने काम केले.

नूर यांनी फ्रान्समध्ये त्यांचे गुप्तहेराचे काम सुरूच ठेवले होते. त्यांच्या एका सहकारी मित्राच्या बहिणीने त्यांची माहिती जर्मन पोलिसांना दिली, त्यातून त्यांना अटक झाली. नूर यांचा जर्मन पोलिसांनी फार छळ केला, पण ब्रिटनच्या गुप्त मोहिमेची कसलीही माहिती त्यांनी पोलिसांना दिली नाही. एक वर्ष त्या जर्मनीच्या कैदेत होत्या. त्यानंतर त्यांना दक्षिण जर्मनीतील छळछावणीत पाठवण्यात आले. तिथंही त्यांचा छळ करण्यात आला, पण त्याचे खरे नावही पोलिसांना कळू शकले नाही. **-संजीव वेलणकर**



## बदलते तंत्रज्ञान

# चॅट जीपीटीला हे प्रश्न विचारू नका, नाहीतर अडचणीत याल

एआयमुळे अनेक कामे सोपी झाली आहेत. चॅटजीपीटी तुम्हाला काही सेकंदातच तुमच्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकते. आपली कामे सोपी झाली असली तरीही एआयवर एवढा विश्वास ठेवणे तुम्हाला अडचणीत आणू शकते. एआय प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यात तज्ज्ञ आहे, पण चॅटजीपीटी आणि इतर एआय टूल्स प्रत्येक वेळी योग्य सल्ला देतात असं नाही. काही प्रश्न एआय टूलला कधीच विचारु नका. नाहीतर तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता.



चॅटजीपीटीवर तुम्ही जर शेअर बाजारात गुंतवणुकीचे प्रश्न विचारत किंवा सल्ले घेत असाल तर आताच बंद करा. एआय चा सल्ला तुम्हाला अडचणीत आणू शकतो. गुंतवणुकीच्या बाबतीत, एआयचा सल्ला घेण्याऐवजी, स्वतः संशोधन करणे आणि नंतर निर्णय घेणे चांगले, अन्यथा तुमचे नुकसानदेखील होऊ शकते.

### आरोग्याबाबत सल्ला घेऊ नका

एआय टूल्स तुमच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे देत असले तरीही तुम्ही आरोग्याबाबत सल्ले अजिबात घेऊ नका. एआयकडून मिळणारा आरोग्य सल्ला तुम्हाला अडचणीत आणू शकतो, आजारावर उपचार घेण्यासाठी फक्त डॉक्टरांचा सल्ला घ्या.

तसेच जर तुम्ही कायदेशीर प्रकरणात चॅटजीपीटी किंवा एआयची मदत घेण्याचा विचार करत असाल, तर -ख टूल्सचे कायदेशीर मत चुकीचे ठरू शकते आणि तुम्ही अडचणीत येऊ शकता. कायदेशीर प्रकरणात तुम्ही एआय ऐवजी वकिलांचा सल्ला घ्यावा.

सध्या अनेक जण ट्रेंड फॉलो करत असतात. असे ट्रेंड फॉलो करुन तुम्ही जाळ्यात अडकू नको. काही दिवसापूर्वी घिबली ट्रेंड आला तेव्हा सर्वांनी हा ट्रेंड फॉलो केला.यावेळी चॅटजीपीटीवर त्यांचे वैयक्तिक फोटो अपलोड करायला सुरुवात केली. एआयने तुमच्यासाठी घिबली आर्टचा एक फोटो तयार केला पण या फोटोच्या मागे लागून तुम्ही तुमचा वैयक्तिक फोटो एआयला दिला, जो आज नाही तर उद्या कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येईल.

चॅट जीपीटीवर तुम्ही फक्त साधे प्रश्न विचारु शकता. प्रवासाचे नियोजन करण्यासाठी, अभ्यासात मदत करण्यासाठी, शहराबद्दल माहितीसाठी किंवा तुमचे कौशल्य सुधारण्यासाठी तुम्ही चॅट जीपीटी वापरू शकता.

# रहस्यकथाकार बाबुराव अर्नाळकर



निमित्त

रहस्यकथा लेखक चंद्रकांत सखाराम चव्हाण उर्फ बाबुराव अर्नाळकर यांचा आज स्मृतिदिन. चंद्रकांत चव्हाण हे बाबूराव अर्नाळकर या टोपणनावाने लिहिणारे मराठी लेखक होते. त्यांचा जन्म ९ जून १९०६ रोजी झाला. मॅट्रिकच्या वर्गात असताना शाळा सोडलेले बाबूराव मराठीतील आघाडीचे रहस्यकथा लेखक होते. त्यांनी एकूण १०४२ रहस्यकथा लिहिल्या.

खऱ्या अर्थाने त्यांनी तळागाळातल्या माणसांना मराठी वाचनाची गोडी लावली. चार आणे मालांपासून त्यांनी सुरुवात केली. त्यांचे नायक झुंजार, धनंजय-छोटू, मेजर सुदर्शन, इन्स्पेक्टर दिलीप, दर्यासारंग हे मराठी घरांघरांतून फिरले. तत्कालीन लोकप्रिय कादंबरीकार ना.सी. फडके यांच्या कादंबर्यांपेक्षा जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांनी बाबूराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या चोरून वाचल्या. ज्या काळात साने गुरुजी आणि वि. स. खांडेकर यांचे आणि ऐतिहासिक चरित्रांचे वाचन हेच शालेय विद्यार्थ्यांसाठी योग्य समजले जात होते त्या काळात मुखपृष्ठावर पाठीत सुरा खुपसलेला मृतदेह आणि किंचाळणारी स्त्री असली चित्रे असलेली बाबूरावांची पुस्तके चोरूनच वाचली जात.

१९४२च्या चळवळीत तुरुंगात असताना 'सामान्य माणसासाठी लिही' असे बाबुरावांना सांगण्यात आले. सामान्य माणसाकरिता लिहायचे म्हणजे काय हे बाबुरावांना पडलेले कोडे होते. बाबुरावांना नाटकाची आवड होती. एका नाट्यक्लबाचे ते सभासद होते. त्या नाट्यक्लबातून ते एकदा विजयदुर्ग किल्ल्यात गेले आणि परत आल्यावर त्यांनी 'सतीची समाधी' नावाची गोष्ट लिहिली, ती अस्नोडकरांच्या 'करमणूक'मधून प्रसिद्ध झाली. त्याच दिवशी बाबुरावांना नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर भेटले. छान गोष्ट आहे, ते म्हणाले. एका मोठ्या माणसाला तुझी गोष्ट खूप आवडली आहे असे म्हणून ते बाबुबावांना नाथ माधव यांच्याकडे घेऊन गेले. नाथ माधवांनी अशाच रहस्यकथा लिही असे सुचवले. बाबूरावांनी मग लेखणी हाती घेतली, ती अखेरच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही.

येरवड्याच्या तुरुंगात असताना विसापूरच्या तुरुंगातील काही राजकीय कैद्यांनी लढा देऊन सर्वच तुरुंगांतील राजकीय कैद्यांना वाचनासाठी पुस्तके पाठवावयास शासनाला भाग पाडले. अशा काही पुस्तकांतून एडगर वॅलेस यांची 'थ्री जस्ट मेन' ही कथा बाबुराव अर्नाळकर यांच्या हाती पडली आणि सामान्यांसाठी काय लिहायचे ते समजले. बाबुरावांचे स्नेही प्रभू हे रहस्यमाला काढीत असत. १९४२च्या फेब्रुवारीत बाबुरावांनी लिहिलेली 'चौकटची राणी' ही पहिली रहस्यकथा पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. बाबुरावांच्या कथांना पाश्चात्त्य कथांचा आधार असायचा, पण त्या कथांना मराठीत लिहिताना महाराष्ट्रीय वातावरणाचा साज असायचा. कथेत कुठेही अश्लीलपण येऊ न देण्याची खबरदारी बाबूराव घेत आणि कथेचा शेवट नेहमी 'सत्यमेव जयते' असाच असे. कथेतील प्रसंग वेगळे असले तरी नायक एकच ठेवायचा हे बाबुरावांनी निश्चित केले होते. नायकाचे नाव बाबुरावांना गीता वाचताना सुचले आणि त्यांनी धनंजय हे नाव मुक्रर केले. बाबूरावांचा कथानायक रुबाबदार, सुस्वभावी, समयसूचक आणि धडाडीचा असल्याने वाचकांना त्याच्या गुणविशेषांची, वागण्याची, बोलण्या चालण्याची चांगलीच ओळख असे. अशा या महान रहस्यकथाकाराचे ५ जुलै १९९६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पोटदुखीचा त्रास वाढतोय? 'अशी' घ्या योग्य काळजी

पाऊस आला की त्याच्या पाठी आजारपण देखील येतं. स्किन इन्फेक्शन, फंगल इन्फेक्शन, केस गळणे, डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड यांसारख्या आजारांसोबतच एक समस्या वारंवार समोर येते ती म्हणजे पोटदुखी. पावसाळ्यात वारंवार पोटदुखी होते, पण पावसात नेमकी पोटदुखी कशाने होते? जाणून घेऊया कारणे.



* कमकुवत प्रतिकारशक्ती -पावसाळ्यात वातावरण बदलल्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत होते. त्यामुळे विषाणू, बॅक्टेरिया यांचा संसर्ग सहज होतो आणि पोटदुखी, जंत संसर्ग होऊ शकतात. तणावामुळेही इम्युनिटीवर परिणाम होतो आणि पोटदुखीची तक्रार वाढू शकते.

* दूषित पाणी - पावसाळ्यात अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्यात अशुद्धता येते. या पाण्यातील जंतू (बॅक्टेरिया, विषाणू, पॅरासाइट्स) पोटात गेल्यास पोटदुखी, जुलाब, उलटी होऊ शकते. झोपडपट्टी परिसरात ही समस्या अधिक तीव्र असते.

* कमजोर पचनशक्ती - पावसात आर्द्रता वाढते, त्यामुळे शरीराच्या पचनसंस्थेवर ताण येतो. पचन प्रक्रिया मंदावते, खाल्लेलं अन्न वेळेवर पचत नाही आणि त्यामुळे गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि पोटदुखी होते.

* शिळे किंवा खराब अन्न -पावसात खाद्यपदार्थ पटकन खराब होतात. अशा अन्नपदार्थांचे सेवन केल्यास फूड पॉइजनिंग, पोटदुखी, ब्लोटिंग, उलटी, जुलाब यासारख्या समस्या उद्भवतात.


### पोटात इन्फेक्शन असल्याची लक्षणं

पोटात सूज, उलटी/मळमळ, खवखवीत ढेकर, गॅस/ब्लोटिंग, छातीत जळजळ, वारंवार जुलाब.

### पावसाळ्यात पोटदुखीपासून बचावाचे उपाय

शुद्ध आणि उकळलेलं पाणी प्या, स्वच्छता ठेवणे अत्यंत गरजेचे आहे, ताजं आणि घरचं अन्न खा. शिळे अन्न टाळा, पचनासाठी हलकं जेवण विशेष करून सूप घ्या, डिहायड्रेशन टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या, तणावापासून दूर राहा, पुरेशी झोप घ्या, अतिसार, उलटी यांसारखी लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# नेरळजवळ अपघातात पतीचा मृत्यू, तर पत्नी गंभीर जखमी



**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत कल्याण राज्यमार्गावर आयसर टेम्पो आणि मोटरसायकलमध्ये भीषण अपघातात घडला. यावेळी मोटरसायकलवरून प्रवास करणारे दांपत्य जबर जखमी झाले. उपचारा दरम्यान पतीचा मृत्यु झाला तर पत्नी गंभीर जखमी झाली आहे. टेम्पोचा चालक फरार झाला आहे.

नेरळजवळील बेकरे असलपाडा गावातील एकनाथ बबन शेंडे (वय ५२) आणि जयश्री एकनाथ शेंडे (वय ४५) हे दांपत्य मोटर सायकलवरून बाजार खरेदीसाठी नेरळच्या दिशेने येत असताना राज्यमार्गावरील टोकरे आंबिवली परिसरात दुपारी चार वाजण्याच्या सुमारास मागून भरधाव येणाऱ्या आयसर टेम्पोच्या चाकाखाली येऊन हा अपघात घडला. त्यानंतर टेम्पो चालक वाहन सोडून फरार झाला आहे.

मोटरसायकल थेट टेम्पोच्या पुढच्या चाकाखाली जाऊन अडकली. अपघात एवढा भीषण होता की मोटरसायकल वरील दांपत्य रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर पडले होते. पतीच्या डोक्याला तर महिलेच्या नाकातून व डोक्यातून रक्त स्त्राव होत होता. यावेळी नागरिकांच्या भीतीनेच टेम्पो चालक आपले वाहन सोडून घटनास्थळाहून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी आणिं कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून फरार टेम्पो चालकाचा शोध घेत आहेत.

# सरखेल कान्होजी आंग्रे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठा आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांच्या २९६ व्या पुण्यतिथी निमित्त आज अलिबाग इथं त्यांना अभिवादन करण्यात आले. भारतीय नौसेनेच्या पश्चिमी कमांडचे कमांडिंग ऑफिसर दीपक सिंघल यांनी कान्होजी राजे आंग्रे यांच्या समाधीवर पुष्पचक्र वाहिले. त्यानंतर रायगड पोलिस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

यानिमित्ताने नगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांची कान्होजी आंग्रे यांच्या पराक्रमावर आधारीत वक्तृत्व स्पर्धा घेतली जाते. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, कान्होजीराजे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे, पोलिस अधीक्षक आंचल दलाल, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्ष अॅड. मानसी म्हात्रे, अलिबाग शहर भाजपाचे अध्यक्ष अॅड. अंकित बंगेरा, काँग्रेसचे अॅड. प्रवीण ठाकूर, डॉ. निशीगंध आठवले आदिंनी कान्होजी आंग्रे यांच्या समाधीवर पुष्पमाला वाहून अभिवादन केले. यावेळी नगरपालिका कर्मचारी, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

यानिमित्ताने गाज फाउंडेशनच्या माध्यमातून आणि राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लिमिटेडच्या सहकार्याने दहावी आणि त्यापुढील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. भारतीय नौसेनेतील करिअरच्या संधी यासंबंधी भारतीय नौसेनेचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर दीपक सिंघल व त्यांच्या सहकारयांनी मार्गदर्शन केले.

# थोर साहित्यिक कै. र.वा. दिघे यांची पुण्यतिथी साजरी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील थोर साहित्यिक कै.र.वा.दिघे यांची ४५ वी पुण्यतिथी खोपोलीत कै.र.वा.दिघे स्मारकात संप्पन्न झाली त्या प्रसंगी बोलताना के. एम .सी.महाविद्यालययाचे प्रा.डॉ.भाऊ साहेब नन्नावरे यांनी कै.र.वा.दिघे यांच्यासाहित्य निर्मितीची योग्य दखल घेतली गेली नाही असे प्रतिपादन केले .

या कार्यक्रमासाठी खोपोली न.पा.चे उपमुख्याधिकारी. पवार, तसेच पाटील मसुरकर,माजी नगराध्यक्ष व साहित्य मित्र, तसेच प्रा.कोरे,सौ. कोरे, जिल्हा कोषाध्यक्ष, कटकदौंड, कै. र.वांचे सुपूत्र वामनराव दिघे, जिल्हा बालविभाग प्रमुख प्रकाश राजोपाध्ये,प्रा मुळीक तसेच गायकवाड, तसेच अन्य सदस्य व नागरिक उपस्थित होते. सर्व मान्यवरांना वाचनालय प्रमुख चैतन्य देशमुख यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. त्या आधी मान्यवरांच्या हस्ते कै.र.वा.दिघेव देवी शारदेच्या प्रतिमेला पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केलं .

कै.र.वां.च्या स्नुषा व खोपोली शाखेच्या अध्यक्षा उज्वला दिघे यांनी र.वा. आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर जनार्दन सताणे यांनी.र.वांच्या पाणकळा या कादंबरीतील पड रे पाण्या, कर पाणी पाणी हे ग्रामीण गीत सुरेल आवाजात सादर केले.सुधा इतराज यांनी त्यांच्या साहित्याची गुंफण करून एक कविता सादर केली.



# राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या गाड्यांची बिनदिक्कत पार्किंग

## वाहतूक पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

अनेक मोठी वाहने पार्किंगसाठी जागा शोधत फिरत असताना, मुंबई पुणे रस्त्यावर अनेक मोठ्या गाड्या बिनधास्त उभ्या असल्याचे चित्र काही दिवस असून अनेक ट्रॅफिक पोलीस या मार्गाने गस्त घालत असताना त्यांना हे दिसत नाही का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सध्या पावसाचे दिवस सुरू आहेत, अनेक हॉटेल पार्किंग जागेवर मोठ मोठे खड्डे दिसत असून चिखलाचे साम्राज्य पसरले आहे, त्यामुळे मोठ्या गाड्यांचे चालक हॉटेल पार्किंग आवारात न जाता रस्त्याच्या कडेला गाड्या उभ्या करताना दिसत आहेत. त्यातच मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार म्हणजे जुना मुंबई पुणे रस्ता आय आर बी यांच्याकडे देखभाल दुरुस्ती साठी असल्याचे समजते, त्यांनी अनेक ठिकाणी प्रवेश बंद केल्याने अनेक गाड्यांना दूर अंतरावर जाऊन गाडी फिरवून आणावी लागते, यात वेळ आणि इंधन खर्च होत आहे, त्यामुळे अनेक चालक गाड्या रस्त्याच्या कडेला उभ्या करून हॉटेल मध्ये जातात, त्यामुळे ना वळण घ्यावे लागत, ना वेळ जातो, ना इंधन खर्च होते.

मोठ्या गाड्या निघून गेल्यावर रस्त्याच्या कडेला चिखल होतो, तो पावसाच्या पाण्याने रस्त्यावर येतो त्याची भीती मोटर सायकल चालविणारे यांना आहे. मात्र या मार्गावर खासगी गाडीतून अनेक वाहतूक पोलीस फिरताना दिसतात. कदाचित वाहन पार्किंग त्यांचा विषय नसल्याने ते रस्त्यावर पार्किंग केलेल्या वाहन चालकांना हट्कत नाहीत! सद्या जुना मुंबई पुणे रस्त्यावर अनेक ठिकाणी अशा उभ्या असलेल्या गाड्यांची रांग बघावयास मिळते.


अॅड. जी. आर. कडव

## जाहिर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, यांचे कोर्टात.....**
**दि.चौ.अर्ज.नं.८९६/२०२५**
**नि. ७ ड**

१. श्री. प्रविण केशव नरसाळे
वय ५७ वर्षे, धंदा नोकरी
रा. वसंत पुष्पा, रुम नं. ३०१,
तिसरा मजला, प्लॉट नं. ८८/२.
गडगे मार्ग, लोखंडी पाडा, पनवेल,
ता. पनवेल जि. रायगड

२. श्री. सचिन केशव नरसाळे
वय ५४ वर्षे, धंदा– नोकरी
रा. सिता निवास, दुसरा मजला,
शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल
ता. पनवेल जि. रायगड

३. सौ. अर्चना प्रकाश वाघे
पूर्वाश्रमीची अर्चना केशव नरसाळे
वय ५० वर्षे, धंदा– गृहिणी रा. लक्ष्मी निवास,
शिवाजी रोड, बस स्टॅन्डजवळ,
पनवेल ता. पनवेल जि. रायगड

४. श्रीमती लता केशव नरसाळे
वय ७८ वर्षे धंदा गृहिणी रा. ००२,
दुसरा मजला, प्लॉट नं. १४८५, सिता निवास,
शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल
ता. पनवेल

} अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही } सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल व अर्जदार नं. ४ यांचे पती कै. केशव रघुनाथ नरसाळे या ता. ८/२/२०२५ रोजी सिता निवास, दुसरा मजला, प्लॉट नं. १४८५, शिवाजी रोड, पनवेल ता. पनवेल जि. रायगड येथे निधन झाले असून त्यांना अर्जदार १ ते ४ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत

अर्जदार यांना सदरचा वारसदाखला शासकीय किंवा निम शासकीय कामाकरिता गरजेचा असल्याने अर्जदारांनी या न्यायालयांत अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्यापुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणा–या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. आज ता.०४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

शिक्का

**सही/–**
क. लिपीक
दि.न्या.क.स्तर पनवेल

**सही/–**
सह. अधिक्षक
दिवाणी न्यायालय.क.स्तर पनवेल



## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की मौजे पाली खुर्द, तहसील– पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करण्यात आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. दिपक चतरलाल मेहता, हेमेंद्र हिरालाल जैन, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पाली खुर्द, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे. आर. प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | रू. पै |
| १/३/६ | १ | ०–२५–१० | ०–०४–९० | ०–३०–०० | २.८९ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजण्यात येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०४/०७/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
**ऑफीस नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/–**
**अॅड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**



## उरण नगरपरिषद, उरण

**ता. उरण, जिल्हा - रायगड ४०० ७०२**

Email-municipalcounciluran@gmail.com urancouncil@rediffmail.com

### फेर -२ जाहीर ई-लिलाव सुचना सन २०२५-२६

उरण नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावरील गाळा क्र. १ व २ जाहीर ई–लिलाव प्रक्रीयेद्वारे भाड्याने देण्याच्या अनुषंगाने मा. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण यांचे मार्फत खाली नमूद तपशिल नुसार इच्छुक ठेकेदार / संस्था यांजकडून जाहीर ई–लिलाव मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशिल | गाळा क्रं. | शॉप/ऑफिस क्षेत्र चौ.मि. (कारपेट क्षेत्र) | वार्षिक ना–परतावा रक्कम | मासिक भाडे रक्कम | फॉर्म फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावरील गाळा क्र. १ व २ जाहीर ई–लिलाव प्रक्रीयेद्वारे भाड्याने देणेबाबत | १ | १३०.०० | ५,८१,४६७/– | ५३.९११/– | ५०००/– | १०,०००/– |
| | | २ | १०८.५० | ४,८५.३०१/– | ४४,९९५/– | ५०००/– | १०,०००/– |

**जाहीर ई-लिलाव सादरीकरण तपशिल.**

| अ.क्रं | तपशिल | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्धी दिनांक | ०५/०७/२०२५ | – |
| २ | दस्तऐवज अपलोड करणेची मुदत | ०५/०७/२०२५ | ११/०७/२०२५ |
| ३ | कागदपत्र तपासणी दिनांक | १४/०७/२०२५ | १६/०७/२०२५ |
| ४ | ऑनलाईन/लाईव्ह ई–लिलाव बोलीची मुदत | १७/०७/२०२५ | १७/०७ २०२५ |

**सुचना/अटी व शर्ती**

ई–लिलावात भाग घेणाऱ्यांनी युजरनेम पासवर्ड नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील. तसेच स्वतःचे डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) वापरणे गरजेचे आहे.
१. ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छीत असलेल्या लिलावधारकांना www.eauction.gov.in या संकेतळावर सविस्तर तपशील उपलब्ध आहे.
२.ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी www.eauction.gov.in या संकेत स्थळावर जावुन पात्रता मिळणेसाठी आवश्यक दस्तऐवजाची पुर्तता करावी लागेल. तसेच आवश्यक कागदपत्रे, अटी शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन संकेतस्थळावर अपलोड करावे व त्याची प्रत नगरपरिषद कार्यालयात दि. ११/०७/२०२५ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी.
३. दि. ११/०७/२०२५ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत प्राप्त झालेले दस्ताऐवजांची तपासणी करुन पात्र लिलावदारांना सुचीत करणेत येईल. तसेच पात्र लिलावदारांना कोणतेही कारण न देता ई–लिलाव नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेकड राखुन ठेवणेत येत आहेत. ई–लिलाव बाबतचा अधिक तपशील नगरपरिषदेचे मिळकत पर्यवेक्षक यांचकडे मिळू शकेल.
४. त्रि– सदस्यीय समितीने ठरवून दिलेले ना–परतावा अनामत रकमेपेक्षा जादा बोलीची ई लिलाच बोली विचारात घेणेत येईल त्यापेक्षा कमी बोलीची ई–लिलाव बोली विचारात घेणेत येणार नाही...
**५. आवश्यक कागदपत्र –**
आधारकार्ड, पॅनकार्ड, आयकर विवरणपत्र (मागील ३ वर्षांचे), शॉप अॅक्ट लायसन्स, फॉर्म फी भरल्याची पावती, इसारा रक्कम भरल्याची पावती, जी.एस.टी. प्रमाणपत्र, इ. सर्व कागदपत्र उपरोक्त संकेतस्थळावर अपलोड करणेत येवून त्याची एक प्रत उरण नगरपरिषद कार्यालयामध्ये विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील.
६. ई–लिलाव बाबत तपशीलवार माहिती मिळकत विभागात मिळेल.

**जा. क्र. उनप/मिळकत विभाग/९५५/२०२५–२६**
**उरण नगरपरिषद, उरण**
**दि. ०४/०७/२०२७**

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



## पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता –नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र–४००७०४

**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स–022-27222132, | ई–मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट – https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**
**दिनांक : 14.07.2025 (सोमवार)**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शौक्षिक वर्ष 2025-26 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शौक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है –

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **भौतिक विज्ञान**/PHYSICS | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (Trained Graduate Teacher) **संस्कृत** / SANSKRIT **हिन्दी** / HINDI **अँग्रेजी** / ENGLISH | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी.ए) एवं बी.एड डिग्री |
| **प्राथमिक शिक्षक** (PRIMARY TEACHER) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से सम्बंधित विषय में ५०% अंकों के साथ १२वीं पास एवं डी.एड. डिग्री और सी.टी.ई.टी |
| **प्रशिक्षक :** Skill Educator | विशेष शिक्षा में स्नातक की डिग्री और बी.एड. या विशेष शिक्षा में डिप्लोमा/स्नातकोत्तर डिप्लोमा के साथ बी.एड. (सामान्य)। भारतीय पुनर्वास परिषद (RCI) द्वारा मान्यता प्राप्त समकक्ष योग्यता। |

**साक्षात्कार दिवस :** 14.07.2025 **(सोमवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM
**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/–**
**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.ए.डी. करंजा**
**प्राचार्य/Principal**
**पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/ PM SHRI Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**

# बोगस डॉक्टरांविरोधात पनवेल मनपा ॲक्शन मोडवर

## कारवाई करण्याचे आयुक्तांनी दिले निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरवर कारवाई करण्याकरिता आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ जुलैरोजी समाज केंद्र कामोठे येथे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक म्हणजेच जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन यांच्या अध्यक्ष व पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली .

सदर बैठकीस पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर कामोठे कळंबोली खांदा कॉलनी पनवेल येथील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचे अध्यक्ष उपस्थित होते. या बैठकीमध्ये वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी बोगस डॉक्टर वर कारवाई करणे व बोगस डॉक्टर शोध मोहीम याविषयी शासनाच्या आरोग्यसेवा आयुक्तालय कार्यालयाकडून आलेले



सूचनेसंबंधी माहिती देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरवर कारवाई करण्याकरिता पालिकास्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे.या समितीचे अध्यक्ष आयुक्त पनवेल महानगरपालिका व सचिव म्हणून वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा समावेश आहे. पालिका स्तरावरील समिती अंतर्गत प्रभाग निहाय क्षेत्रीय समिती गठीत करण्यात आली असून या समिती मध्ये प्रभाग अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक अणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश आहे.

ही समिती त्या त्या क्षेत्रातील सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या दवाखान्यात भेटी देऊन वैद्यकीय व्यावसायिकांच्या प्रमाणपत्राची तपासणी करणार आहेत. तपासणी चा अहवाल पालिका स्तरावरील समितीकडे पाठवणार आहेत. पालिका स्तरावरील समितीकडे बोगस डॉक्टर आढळून आल्यास क्षेत्रीय समिती संबंधित बोगस डॉक्टर वर गुन्हा नोंद करणार आहे.सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांनी महानगरपालिकेच्या अधिकारी यांना योग्य माहिती देण्यात यावी असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी केले आहे. सदर बैठकीस पालिकेचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

**शासन निर्णय**

बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी शासन निर्णयअन्वये जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच नगरपालिका व महानगरपालिकास्तरीय समित्या स्थापन करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार स्थापन झालेल्या समित्यांकडून सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या दवाखान्यात भेटी देऊन वैद्यकीय व्यावसायिकांच्या प्रमाणपत्राची तपासणी करून, तपासणीचा अहवाल पालिका स्तरावरील समितीकडे पाठवण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

## अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे पत्रकार भवनासाठी मागणी



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरूळ परिसरातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज पत्रकार भवन स्थापन करून ते कार्यान्वित करण्यात यावे, अशी जोरदार मागणी बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी राज्याच्या पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्याद्वारे सरकारचे लक्ष वेधले.

आमदार म्हात्रे म्हणाल्या की, नवी मुंबई येथील प्लॉट नं. १५ ए, सेक्टर-३८, नेरूळ येथे नवी मुंबईतील पत्रकारांचे हक्काचे असे पत्रकार भवन सिडकोच्या माध्यमातून उभारण्यात आले आहे. परंतु राज्य शासनांतर्गत कार्यरत असणाऱ्या कोकण विभागीय उपसंचालक कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सिडकोच्या अखत्यारीत असलेले पत्रकार भवन राज्य शासनाकडे ११ वर्षांसाठी करारांतर्गत सुपूर्द करण्यात आले असून ते अद्याप पर्यंत बंद आहे.

बंद इमारतीची अंतर्गत पडझड होत असून नवी मुंबईतील नागरिकांच्या निधीरुपी पैशाचा अप्रत्यक्षपणे का होईना चुराडा होत आहे. तसेच पत्रकार भवन इमारतीवर सिडकोचा कोणत्याही प्रकारचा अधिकार नसल्याने पत्रकारांना संभाव्य सेवा-सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे नवी मुंबईतील पत्रकार बांधवांना प्लॉट नं. १५ ए, सेक्टर-३८, नेरूळ येथे नवी मुंबईतील पत्रकारांचे हक्काचे असे पत्रकार भवन कार्यान्वित करून पत्रकारांना दिलासा देण्याची आवश्यकता असल्याचे म्हात्रे म्हणाल्या.

## नवीन पनवेलमध्ये काव्यसंमेलन रंगले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय साहित्य परिषद, साहित्य भारती, कामोठे पनवेल शाखेच्या वतीन २९ जून रोजी धनंजय देशमुख यांच्या नवीन पनवेल येथील राहत्या घरी महाकवी कालिदास दिनाचे औचित्य साधून 'कोसळती आषाढ धारा' हा काव्य संमेलनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप बोडके यांनी केले, तर निवेदन कवी धनंजय देशमुख यांनी केले, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कादंबरीकार मीनल वसमतकर यांनी भूषविले.

या कार्यक्रमात संस्थेच्या उपाध्यक्ष तसेच गझलकार रंजना करकरे, संजीव शेटे, संदीप बोडके यांच्यासह राकेश त्रिपाठी, मिलिंद कल्याणकर, चारुशीला म्हात्रे, रश्मी राऊत, सुचिता बागडे, कल्पना देशमुख, प्रणाली महात्रे, अनुकूल माळी या कवी-कवयित्रींनीं पाऊस आणि वारी यावर श्रवणीय कविता, गझला सादर केल्या. या कार्यक्रमासाठी मोहनीराज वसमतकर आणि स्वाती देशमुख हे रसिक श्रोते म्हणून उपस्थित होते.

आषाढातील पाऊस कोसळत होता आणि घरामध्ये सुश्राव्य कवितांचा, गझलांचा पाऊस पडत होता. उपस्थित कवी-कवयित्रींना या संमेलनाच्या निमित्ताने तुळशीचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता करकरे, शेटे, बोडके यांनी मेहनत घेतली.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते धनाजी गणू पाटील यांचा ४९वा वाढदिवस परिसरातील जिल्हा परिषद शाळा कासप, कालिवली, खुटलाची वाडी गायचरणवाडी, जांभिवलीवाडी या शाळांना भेट देऊन शालेय प्रयोग वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले.

वह्या, पेन, पेन्सिल, शॉपनर, फूटपट्टी शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शाळा उपयोगी वस्तू वाटण्यात आल्या. या वेळी हरिभक्त परायण विलास महाराज गावंड, दशरथ गायकर, माजी सरपंच शिवाजी माळी, समाजसेवक मंगेश पाटील, उद्योजक एस के पाटील, माजी उपसरपंच मुकेश पाटील ,महेंद्र माळी, समाजसेवक अशोक कचरे, दिलीप पाटील, शाळा कमिटी अध्यक्ष जयवंत माळी, गणेश पोपटे, शिक्षक वर्ग रूपालीताई काळे ज्ञानेश्वर खाणे, मोहन खोमणे सुजाता खोमणे चंद्रकांत देवडे प्रमोद देशमुख जयश्री महाजन कैलास रायकर सर्व गावातील शिक्षण कमिटी सदस्य ग्रामस्थ मंडळ, महिलावर्ग आदी मान्यवर उपस्थित होते.



## गव्हाण विद्यालयात सायबर सुरक्षा व रस्ते सुरक्षा समुपदेशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये गुरुवार दिनांक ३/७/२०२५ रोजी सायबर सुरक्षा व विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी या विषयावर सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ज्ञ विदाश्री भांगे यांचे अभ्यासपूर्ण समुपदेशन झाले.

न्हावा शेवा पोलीस स्टेशन, नवी मुंबई वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली व अनिवासी रयत गुरुकुल अंतर्गत संपन्न झालेल्या या समुपदेशन शिबीरास न्हावाशेवा वाहतूक शाखेचे हेडकॉन्स्टेबल किरण म्हात्रे व राजू भांगरे, कॉन्स्टेबल मयूर पाटील तसेच पत्रकार शाहीद खान, विद्यालयाच्या प्राचार्या व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, विद्यालयाच्या ज्युनिअर



कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले, ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत, करुणा तांडेल, अर्चना पाटील, जयराज सोनटक्के, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आदी उपस्थित होते.

गुरुकुल इयत्ता दहावी ब या वर्गाचे वर्ग शिक्षक व विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी प्रास्ताविक पर भाषणात सायबर गुन्हे व विद्यार्थ्यांनी त्या संदर्भात घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांना विद्यालयाच्या वतीने तुळशीची रोपे भेट देऊन त्यांचा त्यांचे स्वागत करण्यात आले.

सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांनी फेसबुक ,स्नॅपचॅट, व्हाट्सअप,इंस्टाग्राम याद्वारे होणाऱ्या गुन्ह्यांबद्दल माहिती दिली आज मोठ्या प्रमाणात तीन पत्ती रम्मी ऑनलाइन खेळली जाते यामुळे अनेक विद्यार्थी या जाळ्यामध्ये कसे अडकले आहेत याबद्दल माहिती दिली. एखादा गुन्हा घडला तर त्यानंतर कोणती काळजी घ्यावी, आपल्याकडून कोणताही गुन्हा घडला नसेल तर सायबर हेल्पलाइनची मदत घेणे कसे आवश्यक आहे या विषयी विस्ताराने माहिती सांगून समुपदेशन केले.विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरताना विशेष काळजी घेण्याची आवश्यकता प्रतिपादन करताना एखादा अनोळखी ॲप डाऊनलोड करणे, एखादी अनोळखी वेबसाईट लिंक ओपन करणे टाळावे तसेच सोशल मीडियावरील अवैध अमिषाला बळी पडू नये असाही, असा सल्ला दिला.

या वेळी वाहतूक शाखेचे कॉन्स्टेबल मयुर पाटील यांनी दुचाकी वाहनस्वारास हेल्मेटची अनिवार्यता तसेच रस्ता ओलांडताना सिग्नलचे ज्ञान व विविध वाहतूक चिन्हांची माहिती दिली. या वेळी वाहतूक शाखेचे हेड कॉन्स्टेबल राजू भांगरे यांनी रस्त्यावर होणाऱ्या अपघाताबद्दल माहिती सांगितली व अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार ज्येष्ठ शिक्षक सागरकुमार रंधवे यांनी मानले.

# आषाढीनिमित्त कोलीवूडचं 'दिंडी चालली' गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या आषाढी वारीचे वेध प्रत्येकाला लागले आहेत. सर्वत्र विठूनामाचा जयघोष होताना दिसतोय. संतांच्या पायी पालख्या पंढरपूरच्या दिशेने रवाना झाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर विठ्ठलाशी असलेलं आपलं घट्ट नातं सांगणारे अनेक चित्रपट, अनेक गाणी रसिकप्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत, मात्र एका संत परंपरेला पांडुरंगाच्या भेटीची लागलेली चाहूल आणि भक्तिमय वातावरणात तल्लीन होऊन आजोबा आणि नातीची अनोखी वारी घडवणार 'दिंडी चालली' हे गाणं वारकऱ्यांच्या नुकतचं भेटीला आलं आहे. विशेष म्हणजे या गाण्याचं संपूर्ण छायाचित्रण थेट देहू आळंदी पायी दिंडी दरम्यान करण्यात आलं आहे.

हे गाणं प्रवीण कोळी आणि योगिता कोळी यांच्या लेखणीतून संगीतबद्ध झाले असून, कोलिवूड प्रॉडक्शनच्या माध्यमातून या गीताची




निर्मिती करण्यात आली आहे. प्रसिद्ध गायक आदर्श शिंदे यांनी हे गाणं गायलं आहे. तर, जेष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, अक्षय गोरे, मोनिका आणि सिनेबालकलाकार मायरा वायकुल या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. या संपूर्ण गाण्याचं छायाचित्रण पराग सावंत तर, गीताचं संपादन संदेश कोळी यांनी केले आहे. गाण्यातून आपल्याला पंढरीच्या वारीची अनुभूती घेता येते. पंढरपूर, तिथला परिसर, तुळस डोक्यावर घेऊन चालणाऱ्या वारकरी महिला, हातात टाळ, वीणा घेतलेले व विठूनामाचा गजर करणारे वारकरी असा सर्व माहोल या गाण्यात अचूक टिपला आहे.

दरम्यान, आषाढी एकादशी जवळ आली की, प्रत्येक विठ्ठल भक्तांना ओढ लागते ती पंढरपूरच्या वारीची. विठ्ठलाला भेटण्यासाठी अनेक भक्त पायी पायी पंढरपूरच्या दिशेने निघतात. भक्ती अन् भजनांमध्ये दंग होत विठुनामाचा गजर करत करत पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. वारीचा हा नेत्रदीपक सोहळा अनुभवण्यासाठी दरवर्षी अनेक वारकरी पालखीत सहभागी होत असतात,

मात्र यंदा प्रदर्शित झालेल्या 'दिंडी चालली' या गाण्याच्या माध्यमातून वारकऱ्यांना पायी दिंडी अनुभवता येणार असल्याचं या गाण्याचे दिग्दर्शक प्रवीण कोळी आणि योगिता कोळी यांनी सांगितले.

## मुळेखंड येथे ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस



**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक, मुळेखंड तेलीपाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा,आणि परिसर मधील ज्येष्ठ नागरिकांचे मंगळवारी (दि.३०) ७० ज्येष्ठ नागरिक, बंधू भगिनींचे वाढदिवस मोठ्या उत्साहात व मोठ्या थाटामाटात साजरे करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक मंडळाच्यावतीने ज्यांचे वाढदिवस आहेत अश्यांना श्रीफळ, गुलाबपुष्प व भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यात ग्रुप ग्रामपंचायत चाणजे सरपंच अजय गोविंद म्हात्रे यांना पुढारी आदर्श सरपंच मिळाल्या बद्दल मंडळाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पां.म्हात्रे आणि चिटणीस परशुराम पाटील यांच्या हस्ते अजय म्हात्रे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी उद्योजक मंडळाचे आधारस्तंभ बसूसेठ हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प.रमेशबुवा उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे कार्याध्यक्ष अनंत पाटील यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सदस्य अंकुश म्हात्रे, मोतीराम कुंभार, ईश्वर म्हात्रे, सुभाष गुरव, हरिचंद्र म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, नथुराम म्हात्रे, रमेश म्हात्रे आदींनी परिश्रम घेतले.

## श्रीशैल देवमानेला कम्प्युटर सायन्सची पदवी प्रदान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत असणाऱ्या कंपनीत इंजिनिअरिंग मॅनेजर म्हणून सेवेत असणारे विनायक देवमाने यांचा सुपुत्र श्रीशैल देवमाने यास नुकताच मुंबई विद्यापीठ अंतर्गत शहा अँड अँकर कच्छी इंजिनिअरिंग कॉलेजच्या वतीने कम्प्युटर सायन्समध्ये पदवी प्राप्त झाली आहे. या आनंदोत्सवामुळे देवमाने कुटुंबात मानाचा तुरा उंचावला आहे.

श्रीशैल याने डी.ए.व्ही कॉलेज मध्ये आपले १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले असून ठाणे येथील TCS मध्ये सध्या नोकरी करत आहे. तसेच त्याची आई डॉ. विद्युलता देवमाने या शहा अँड अँकर कच्छी इंजिनिअरिंग कॉलेज



मधील कम्प्युटर सायन्स डिपार्टमेंटच्या हेड आहेत. तसेच वयाच्या २२ व्या वर्षी ही पदवी स्वीकारताना श्रीशैल व संपूर्ण देवमाने कुटुंबाला अधिक आनंद झाला असल्याचे दिसून आले.

मुंबई विद्यापीठ अंतर्गत शहा अँड अँकर कच्छी इंजिनिअरिंग कॉलेज च्या आयोजित दीक्षांत समारोह कार्यक्रमात सर्व गुणवंत पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राद्वारे सन्मानित करण्यात आले. या वेळी श्रीशैल यास पदवी प्रदान करण्याची वेळ आली त्यावेळी त्याची आई डॉ. विद्युलता यांनीच श्रीशैल याचे नामांकन केले. त्यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनीसुद्धा डॉ. विद्युलता यांचे अभिनंदन करत आपल्या मुलासोबत पदवी पुरस्कार स्वीकार करण्याची विनंती केली.

या वेळी श्रीशैल देवमाने याच्यासोबत त्याचे वडील विनायक देवमाने, आई विद्युलता देवमाने, आजी रुक्मिणी देवमाने, बहीण श्रीशा, काका लक्ष्मीकांत देवमाने, प्रकाश देवमाने, काकू सीमा देवमाने, आत्या शोभा चव्हाण, रुद्राणी, मृणाल आदींनी पुरस्कार सोहळ्यात व्यासपीठावर जाऊन पुरस्कार स्वीकार केला. शहा अँड अँकर कच्छी इंजिनिअरिंग कॉलेज चे कुलगुरु यांच्याहस्ते पदवी पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी देवमाने कुटुंबासह, नातेवाईक, मित्र, मैत्रिणी उपस्थित होते.

## वाघोशी पंचक्रोशीत वीजपुरवठा होतोय खंडित

# नागरिकांचा महावितरणाला घेराव

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात पावसाळ्यात वीज समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने वाघोशी पंचक्रोशीतील संतप्त नागरिकांकडून पाली सुधागड महावितरण कार्यालयाला घेराव घालण्यात आला.

वाघोशी पंचक्रोशीत वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून रोजच विजबत्ती गुल होत आहे. मागील काही दिवसांपूर्वी कुंभारघर येथे सतत तीन दिवस वीजपुरवठा खंडित होता. आजघडीला देखील रोज काही ना काही कारण सांगून विद्युत पुरवठा खंडित होत असतो व हा पुरवठा सुरळीत करण्याकरिता लाईनमन येण्याची वाट पाहावी लागत असते. वाघोशी पंचक्रोशीत कुठलाही लाईनमन राहत नसल्याने हा लाईनमन पालीवरून जेव्हा येईल त्यावेळेला लाईन सुरू केली जाते. तोपर्यंत येथील जनतेला अंधारात बसावे लागते याचा जाब विचारण्याकरिता पंचक्रोशीतील नागरिकांनी महावितरण कार्यालय येथील अधिकारी बालाजी छात्रे व राहुल भंडारी यांच्यासमोर घेराव घालून जाब विचारला. या वेळेला वाघोशी ग्रामपंचायतीतील नागरिकांनी सांगितले की आम्हाला एक कायमस्वरूपी लाईनमन आमच्या इथे राहायला हवा, अशी मागणी केली.



याबाबत महावितरण अभियंता बालाजी छात्रे व राहुल भंडारी यांनी सांगितले की आम्ही लवकरात लवकर तुम्हाला तिथे राहील असा लाईनमन देऊ. सध्या परिस्थितीमध्ये आमच्याकडे स्टाफ कमी आहे आणि काम जास्त आहे. तरीदेखील आम्ही प्रयत्न करू.

ग्रामस्थांनी सांगितले की जर येत्या आठ दिवसांमध्ये आम्हाला लाईनमन मिळाला नाही तर आम्ही जनआंदोलन करू. कायद्याने जर लाईनमनला घर भाडे भत्ता मिळतो, तर त्यांनी जिथे त्याचा हेडक्वार्टर आहे तिथेच राहिले पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे.

या वेळी वाघोशी पंचक्रोशीतील ग्रामस्थ गणेश बुवा देशमुख, भरत गोळे, सुदेश देशमुख, चिंतामण पवार, अमित गायकवाड, सुरेंद्र खेडकर, दत्तात्रय हातकमकर, रोशन खंडागळे, गणेश लटके, प्रशांत आरेकर, परशुराम सगळे, चेतन तळकर आदी उपस्थित होते.

## महिला बचत गटांना जि.प. सेस फंडातून दळणयंत्र वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून मुरुड प्रकल्पांमधून ग्रामीण भागातील जनतेस स्वायत्त व स्वयंनिर्भर बनवण्यासाठी ग्रामीण भागतील बचत गटातील तीन महिलांना बचत गट सक्षम करण्यासाठी पल्वे लायझर दळण मसाला चक्कीचे वाटप नुकतेच मुरुड येथील पंचायत समिती प्रकल्प कार्यालयात करण्यात आले.

या कार्यक्रमाला बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, कक्ष अधिकारी संजय वानखेडे, शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम संघटना अध्यक्ष दिनेश मिणमीने, पर्यवेक्षिका शुभांगी कोतवाल, सुवर्णा चांदोरकर, कनिष्ठ सहाय्यक आशा सोनकुसरे, राजपुरी जिल्हा परिषद गणाच्या संपर्क प्रमुख जिविता मिणमिणे उपस्थित होते.

मुरुड तालुक्यातील श्री समर्थ महिला बचत गट वांद्रे, श्री समर्थ महिला बचत गट मजगाव आणि बिस्मिलाह स्वयंसहायता महिला बचत गट यांना यंत्राचे वाटप करण्यात आले. बचत गटांमधील महिलाना सहाय्यक उद्योग करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी राज्य शासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.बचत गटांच्या माध्यमातून विविध अनुदान व विविध योजनाद्वारे बचत गट प्रभावी व सक्षम करण्याचा राज्य शासनाचा मुख्य हेतू आहे. कार्यक्रमास बचत गटांमधील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बचत गटाच्या महिलांनी सवलत मूल्य किमतीत दळण यंत्र मिळाल्याने सर्व महिलांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.



## रोह्यात आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तहसीलदार कार्यालया र्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे शनिवारी (दि.५) सकाळी १० वा होणार आहे. या शिबीरास नागरीक, शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने यावे व विद्यार्थ्यांना या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ.किशोर देशमुख यांनी केले आहे.


या कार्यक्रमास महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपविभागीय अधिकारी रोहा ज्ञानेश्वर खुटवड हे उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमात मान्यवरांचे हस्ते विविध विभागातील सेवाबाबत मंजुरी पत्र दाखले, प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये जनतेचे काही प्रश्न असल्यास त्याबाबत देखील समाधान होण्याबाबत आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात तालुक्यातील सर्व विभागाचा सहभाग राहणार असून विविध विभागाच्या नवीन योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच या शिबीरादरम्यान विविध योजनेसाठी लाभार्थ्यांनी अर्ज करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच सद्य: परिस्थितीत नागरिकांना व विद्यार्थ्यांना लागणारे विविध दाखले या शिबीरात देण्यात येणार आहेत.

शिबीरात रोहा तालुक्यातील अनुक्रमे पंचायत समिती रोहा, तालुका कृषी, तालुका आरोग्य, उपअभियंता, म.रा.वि.मं. रोहा, उप अधिक्षक भूमि अभिलेख रोहा, संजय गांधी निराधार, पुरवठा, निवडणूक व आपत्ती व्यवस्थापन विभाग कडील विविध उपक्रमे व त्याची माहिती बाबतचे स्टॉल उभारण्यात येणार आहेत.

## डोंगर माळरान बनले गुरांचे खाद्य

**खोपोली : प्रतिनिधी**



कोकणातील बहुतेक शेतकरी शेती व्यवसाय बरोबर पशु पालन करीत असल्यामुळे पशु पासून मिळणाऱ्या उत्पनापासून रोजच्या दैनंदिन जिवनात अर्थिक ची कमतरता भासत नाही.घरासमोर पशुधन असल्याने त्याचा उपयोग शेतीसाठी आणि दुग्ध व्यवसायासाठी होत असतो. पावसाळयात मोठ्या प्रमाणात गवत निर्माण झाल्यामुळे गुरांची चाऱ्या आभावी उपास मारी होत नाही. नसून दर वर्षी माळरान तथा डोंगरदादा या गुरांचा भुक शांत करीत असल्यांचे दृश्य पहावयांस मिळत आहे.

पावसाला संपला की पशुधन पाळणे शेतकऱ्यांना मोठ्या कष्टाचे होते, कारण पावसाळ्यात निर्माण झालेले गवत उन्हाळी सुकून जाते आणि शेतकऱ्याला या सुकलेल्या गवताचा पेंढा म्हणून उपयोगात येत असते, परंतू दर वर्षी उन्हाळ्यात काही व्यक्ती डोंगराळ भागात वणवे लावत असल्याने सुकलेले गवत जळून खाक होते.यामुळे गुरांना उपासमारीची वेळ निर्माण होत असते.

दरवर्षी पावसाळ्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गवत निर्माण होत. असल्यामुळे चार महिने चाऱ्यांचा प्रश्न सुटत असतो. त्याचबरोबर अनेक ठिकणी असलेले जलाशय पाण्याने पूर्ण भरले असल्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागत असतो. यामुळे पावसाळ्यात गुरे पाळणे सोयस्कर होते, परंतू आठ महिने मोठ्या कष्टाचे काढावे लागतात, अशी खंत गुरे चारण्यासाठी माळरानावर आणलेल्या शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## आदिवासी शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**नेरळ : प्रतिनिधी**

श्री विद्या फांऊडेशन मुंबई प्रमुख गीता शेट्टी यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळा यांना भेट देत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. शिक्षक वसंत ढोले यांनी यासाठी प्रयत्न केले.

कर्जत तालुक्यातील पोशिर ग्राम पंचायतमधील आदिवासी परिसरातील गिरेवाडी, उंबरवाडी, चिंचवाडी, वाघ्याचीवाडी, देवपाडा अशा पाच शाळांतील २९५ विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे.

या कार्यक्रमास श्री विद्या फांऊडेशनच्या प्रमुख गीता शेट्टी, चंद्रहास शेट्टी, शौनक वाघ, प्रणव नेगी, गिरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक वसंत ढोले, भारती तुपे, देवपाडा शाळेचे मुख्याध्यापक, उंबरवाडी शाळेचे मुख्याध्यापक दिनेश शिंगवा, चिंचवाडी शाळेचे मुख्याध्यापक सुरेखा जगताप, वाघ्याचीवाडी शाळेचे मुख्याध्यापक आप्पासाहेब जाधव तसेच पाचही शाळांचे शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी व पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी फांऊडेशनेचे कौतुक करण्यात आले.

## चौक बाजारपेठेतील रस्त्यावर पडले खड्डे

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक गावातील बाजारपेठ रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांतील खड्डे चुकवित असताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

बाजारपेठ रस्त्यावरील खड्डे पाण्याने भरल्याने वाहचालक खड्डे चुकवित असताना खड्ड्यातील पाणी अंगावर आल्याने वादाच्या घटना घडत आहेत. चौक गावातील बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची चाळण झाल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. तरी संबंधित विभागाने याची दखल घेवून चौक गावातील बाजारपेठ रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी प्रवासी नागरिकांतून होत आहे.



## खालापूर येथे बहुउद्देशीय सभागृहाचे भूमिपूजन

**चौक : प्रतिनिधी**

टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या माध्यमातून नेहमीच समाज कल्याण योजना राबविण्यात येत असल्याने समाज कल्याणासाठी त्यांचे सहकार्य लाभते, असे उदगार खालापूर कर्जतचे उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी काढले.

टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या वतीने खालापूर महसूल विभागाच्या नवीन प्रशासकीय ईमारतीत बहुउद्देशीय सभागृहाचे भूमिपूजन खालापूर कर्जत उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या हस्ते व तहसीलदार अभय चव्हाण यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी त्यांनी टाटा स्टील फाऊंडेशन यांचे आभार व्यक्त करून त्यांचा सन्मान केला.



बहुउद्देशीय सभागृह म्हणजे अनेक कामांसाठी वापरता येणारे सभागृह,हे सभागृह विविध कार्यक्रमांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, सभा, व्याख्याने, प्रशिक्षण वर्ग, प्रदर्शने इत्यादींसाठी वापरले जाणार आहे. तसेच योजनेचा प्राथमिक उद्देश महिलांना सक्षम करणे आणि बचत गटांद्वारे कमाईच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. हा प्रकल्प जिल्हा स्तरावर उद्योजकता वाढवण्यासाठी आणि नवोदित उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी तयार करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे हिरकणी कक्ष स्थापन करून कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक ठिकाणी किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये स्तनदा मातांसाठी स्वतंत्रपणे आणि सोयीसुविधांनी युक्त अशी खोलीदेखील करण्यात येणार आहे.

निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, कार्यकारी अधिकारी टाटा स्टील कपिल मोदी, सी.आर.एम. प्रमुख शशी भूषण, भावेश रावल, सार्वजनिक बांधकाम अभियंता राकेश राखाडे, सतीश गायकवाड,मंडळ अधिकारी संदेश पानसरे, महसूल अधिकारी माधव कावरखे, कर्मचारी उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त भाल विठ्ठलवाडीत विविध कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पेण तालुक्यातील विठ्ठल रखुमाई मंदिर भाल- विठ्ठलवाडी येथे शनिवार ५ जुलै ते व रविवार ६ जुलै असे दोन दिवस धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या ठिकाणी हरिपाठ, काकडा, दिंडी, कीर्तन असे विविध कार्यक्रम होणार आहेत. शनिवार ५ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता नरेंद्र विठोबा म्हात्रे यांच्या विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळाचा हरिपाठ होईल रात्र ९वाजता हभप प्राची मंदार व्यास डोंबिवली यांचे हरिदासी कीर्तन होईल त्यांना तबला साथ जितेंद्र म्हात्रे व हार्मोनियम साथ समाधान म्हात्रे यांची असेल.

रविवार ६ जुलैच्या आषाढी एकादशीने निमित्ताने सकाळी ५ वाजता काकडा, त्यानंतर ग्रामस्थ मंडळ भाल विठ्ठलवाडी यांची संपूर्ण गावात सकाळी ९ वाजता दिंडी फिरेल सकाळी १० वाजता हभप प्राची मंदार व्यास ( डोंबिवली) यांचे पुष्पवृष्टीचे कीर्तन होईल. सायंकाळी ६ वाजता हरिपाठ होईल रात्र ९ वाजता प्राची मंदार व्यास यांचे कीर्तन होऊन कार्यक्रमाची व उत्सवाची सांगता होईल, अशी माहिती देण्यात आली.

## कर्जतच्या छत्रपती शाहू महाराज चौकात फाऊंटन आणि कोपरा गार्डनचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील गुंडगे गावातील छत्रपती शाहू महाराज चौकात फाउंटन आणि कोपरा गार्डन तसेच स्मशानभूमी लोकार्पण सोहळा संपन्न झाला. माजी उपनगराध्यक्ष उमेश गायकवाड यांचा वाढदिवस त्यांनी स्मशानभूमी मध्ये केक कापून साजरा केला.

छत्रपती शाहू महाराज चौकात फाउंटन आणि कोपरा गार्डनचे उदघाट्न जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या उपस्थितीत उमेश गायकवाड यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या चौकात भारतीय संविधानाचे प्रतीकही उभारण्यात आले आहे. बुद्धविहार येथे नव्याने होणाऱ्या सभागृहाच्या दहा लाखांच्या कामाचे भूमिपूजन देखील यावेळी करण्यात आले. याप्रसंगी माजी नागसेवक सोमनाथ ठोंबरे, पुष्पा दगडे, सुवर्णा निलधे, ॲड. स्वप्नील पालकर, योगेश गायकवाड, सोमनाथ पालकर आदी उपस्थित होते.

सनदी लेखापाल विक्रम वैद्य आणि प्रा. अनिरुद्ध जोशी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास, शिस्त आणि करिअर विषयक महत्त्वाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी आमदार मनोज जामसुदकर व माजी नगरसेवक सूर्यकांत पाटील यांनी देखील उपस्थिती दर्शविली होती. तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



## कृषी दिन उत्साहात साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

कृषी दिनी माणगाव तालुक्यातील काही मंडळींनी साले, कळमजे, चेरवलीसह विविध गावांतील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन भात लावणीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला आणि शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकत अडचणी समजून घेतल्या.

या वेळी पंकज तांबे, त्यांचे सहकारी मुकुंद वाढवळ, स्वप्नील शिर्के, सिद्धार्थ गायकवाड, विजय वाढवळ, शरद वाढवळ, संदीप खडतर, देवा राऊत, सुभाष भोनकर आनंद भोनकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरवर्षी १ जुलै रोजी कृषी दिन साजरा होतो. याच पार्श्वभूमीवर तांबे यांनी औपचारिक कार्यक्रम न करता शेतात वाढदिवस जाऊन साजरा केला.

## रेवदंडा बसस्थानकातील खड्डे, बेशिस्त पार्किंग अपघातास निमंत्रण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रवासीवर्गाचे जिव्हाळयाचे असलेले रेवदंडा एस.टी. बसस्थानक आवारात पडलेले मोठे खड्डे व स्थानकांच्या आवारात बेशिस्तीने केलेली वाहन पार्किग यामुळे अपघातास निमंत्रण ठरते. भविष्यात आवारात सर्वत्र पडलेले मोठे खड्डे व बेशिस्त अनाधिकृत वाहने पार्किग स्टँड यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता संभवते.

रेवदंडा एस.टी. बस स्थानक अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे, नित्याने तिन्ही तालुक्यात येथून एस.टी.बसेस जा-ये करत असतात. येथूनच मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डी, आदी महाराष्ट्रात मुरूड एस.टी.डेपोच्या दुरवर जात असलेल्या एस.टी.बसेस थांबा आहे. या एस.टी.बस स्थानकांत प्रवासीवर्ग व स्थानिकांचे वर्दळ असल्याने नित्याची गर्दी आढळते.

रेवदंडा एस.टी.बस स्थानक आवारात पावसाळयात मोठे मोठे खड्डे निर्माण झाले होते, या खड्डात पावसाळ्यात पाणी साचून तळी निर्माण झाली होती. सध्या पावसाला नसल्याने खड्डयात पाणी नाही, मात्र भले मोठे खड्डे तसेच आहेत. स्थानकांच्या आवारात एस.टी. बसेस ये-जा करत असताना या खड्डाने बसेसमधील प्रवाशाना धक्का बसतो तसेच खड्डे चुकविताना वाहनचालकांचीसुध्दा भंबेरी उडते. या वेळी स्थानकांच्या आवारातील प्रवासीवर्ग अथवा स्थानिक यांना बसेस चालकांचे खड्डे चुकविण्याचे प्रयत्नात धक्का लागून अपघात होण्याची निश्चित शक्यता संभवते. याबाबत उपाययोजनेची मागणी होत आहे.

# सुरुवातीच्या पडझडीनंतर इंग्लंडची दमदार वाटचाल

## स्मिथ-ब्रूकची शतके, यजमानांची धावसंख्या ३०० पार



**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम कसोटी सामन्यात शुक्रवारी (दि. ४) तिसऱ्या दिवसाच्या खेळात भारतीय संघाने शानदार सुरुवात करत इंग्लंडच्या संघाची अवस्था ५ बाद ८७ धावा अशी केली. संघ अडचणीत असताचा इंग्लंडचा विकेट किपर बॅटर जेमी स्मिथ विक्रमी शतकी खेळी साकारली. पाठोपाठ हॅरी ब्रूकने शतक ठोकले. त्यामुळे इंग्लंडची धावसंख्या तीनशेपार गेली.

जो रूट आणि हॅरी ब्रूक या जोडीनं ३ बाद ७७ धावांवरून तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. इंग्लंडच्या धावफलकावर ८५ धावा असताना मोहम्मद सिराजने रूटच्या रुपात इंग्लंडच्या संघाला चौथा धक्का दिला. त्याची जागा घेण्यासाठी आलेला बेन स्टोक्सही शून्यावर माघारी फिरला. संघ अडचणीत असताना जेमी स्मिथने आक्रमक अंदाजात फलंदाजी करत लंच आधी शतक साजरे केले. अर्धा संघ तंबूत परतल्यावर बेझबॉल रणनिती फॉलो करत या पठ्ठ्याने ८० चेंडूत शतक साजरे करत केले. इंग्लंडच्या संघाकडून त्याने कसोटीत तिसऱ्या जलद शतकाची नोंद केली. एवढेच नाही तर या शतकी खेळीसह १४८ वर्षांत जे कुणाला जमले नाही तो पराक्रम त्याने करून दाखवला.

जेमी स्मिथने ८० चेंडूत १४ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने आपल्या कसोटी कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले. १८७७मध्ये खेळवण्यात आलेल्या पहिल्या कसोटी सामन्यानंतर स्मिथ हा इंग्लंडचा पहिला फलंदाज ठरला, ज्याने लंचपूर्वी एका सत्रात १०० पेक्षा अधिक धावा केल्या. लंच आधी हॅरी ब्रूकसह त्याने १६५ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला.

ब्रुकनेही चौकार लगावत आपले शानदार शतक पूर्ण केले आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटाचा स्वीकार केला. त्यामुळे या दिवसावर इंग्लंडने वर्चस्व मिळवले.

# गुकेशकडून कार्लसनचे गर्वहरण

## क्रोएशियातील बुद्धिबळ स्पर्धेत नमविले




**झॅग्रेब : वृत्तसंस्था**

भारतीय ग्रँडमास्टर आणि विद्यमान वर्ल्ड चॅम्पियन बुद्धिबळपटू डी. गुकेशने नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनला पुन्हा एकदा गुकेशने चारीमुंड्या चीत केले आहे. झॅग्रेबमध्ये पार पडलेल्या सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ क्रोएशिया २०२५ स्पर्धेतील सामन्यात गुकेशने कार्लसनला रॅपिड अँड ब्लिट्झ या अवघड प्रकारात नमवले आणि स्पर्धा सुरू होण्याआधी गुकेशला 'कमजोर खेळाडू' म्हणून हिणवणाऱ्या कार्लसनला गुकेशने आपल्या खेळातून सडेतोड उत्तर दिले

जागतिक बुद्धिबळपटूंमध्ये मॅग्नस कार्लसनचे नाव सध्या सर्वोच्च शिखरावर आहे, पण याच कार्लसनला भारताच्या गुकेशने सलग दुसऱ्यांदा दोन वेगवेगळ्या प्रकारांमध्ये पराभूत करण्याची किमया साध्य केली आहे. विशेष म्हणजे गुकेशची खेळण्याची पद्धत ही क्लासिक असूनही रॅपिड अँड ब्लिट्झ या अवघड प्रकारात गुकेशने मॅग्नस कार्लसनला मोठ्या हिकमतीने खेळत हरवून दाखवले.

मॅग्नस कार्लसनने स्पर्धा सुरू होण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना गुकेश या स्पर्धेतला आणि या प्रकारातला एक कमजोर खेळाडू असल्याचे म्हटले होते. गुकेश रॅपिड अँड ब्रिट्झ प्रकारात कितपत पुढे जाऊ शकेल याबाबत शंका आहे. गुकेशविरोधात या स्पर्धेदरम्यान होणाऱ्या सामन्यांमध्ये (रॅपिड प्रकारातील एक व ब्लिट्झ प्रकारातील दोन) तो स्पर्धेतील काही कमजोर खेळाडूंपैकी एक असल्याप्रमाणे खेळेन, असे कार्लसन म्हणाला होता. या स्पर्धेदरम्यान या प्रकारात गुकेशची कामगिरी चांगली होईल असे त्याने काहीही करून दाखवलेले नाही. त्यामुळे या प्रकारात तो चांगला खेळाडू आहे किंवा नाही हे अजून सिद्ध व्हायचेय. त्याला खूप काही करून दाखवायचेय, असेही कार्लसन म्हणाला होता.

गुकेशसमोर पराभव पत्कराव्या लागलेल्या नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने आपली चूक मान्य करून गुकेशच्या उत्तम खेळीचे कौतुक केले आहे. गुकेश खूप उत्तम खेळतो आहे. अजून या स्पर्धेत खूप काही घडायचे आहे, पण या स्पर्धेत सलग पाच सामने जिंकणे ही छोटी गोष्ट नाही, असे कार्लसन सामन्यानंतर दिलेल्या प्रतिक्रियेत म्हणाला.

गुकेश याने याआधी नॉर्वेतील बुद्धीबळ स्पर्धेतही कार्लसनला पराभूत केले होते. आता दुसऱ्यांदा डी. गुकेशनं स्टार बुद्धीबळपटूसमोर छाप सोडली आहे. डी गुकेश शिवाय आर प्रज्ञाननंदा यानेही या खेळाडूला पराभूत करून दाखवले आहे. आता या स्पर्धेत दोन्ही खेळाडूंमध्ये ब्लिट्झ प्रकारात दोन लढती होणार आहेत.

**मी अत्यंत वाईट खेळ केला, पण या विजयाचे पूर्ण श्रेय हे गुकेशच्या चांगल्या खेळाचे आहे. तो खूप चांगले खेळतोय. जोखीम घेतोय. या स्पर्धेत आत्तपर्यंत मी खूप वाईट खेळलो आहे. त्याची शिक्षा यावेळी मला मिळाली.**
**–मॅग्नस कार्लसन**

### गॅरी कास्पारोव्हकडूनही गुकेशचे कौतुक

सध्याच्या घडीला बुद्धीबळ जगतात दबदबा असणाऱ्या खेळाडूला शह देत गुकेशने स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी करून दाखवली. या सामन्यादरम्यान कॉमेंट्री करणारे माजी चॅम्पियन गॅरी कास्पारोव्ह यांनीदेखील गुकेशचे कौतुक केले. गुकेशशी खेळायचे म्हणजे कम्प्युटरशी खेळण्यासारखे आहे. तो सर्वात जिद्दी खेळाडू आहे. प्रत्येक गेममध्ये त्याच्याकडे खूप साऱ्या लाईफ असतात. त्यामुळे तुम्हाला त्याला प्रत्येक गेममध्ये किमान पाच वेळा तरी हरवावे लागते. तुम्ही कदाचित त्याच्याविरुद्ध जिंकतदेखील असाल, पण कुठल्यातरी एका क्षणी तुमचे लक्ष विचलित होते आणि तुम्ही पराभूत झालेले असता, अशा शब्दांत गॅरी कास्पारोव्ह यांनी गुकेशवर स्तुतिसुमने उधळली आहेत.

# ...म्हणून जडेजाने मोडला बीसीसीआयचा नियम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर बीसीसीआयने एक नवीन नियमावली तयारी केली होती. त्यानुसार सर्व खेळाडूंना टीम बसमध्ये एकत्र स्टेडियममध्ये येण्या-जाण्याबाबतही नियम आहे, परंतु एजबॅस्टन कसोटीच्या दुसऱ्या दिवशी रवींद्र जडेजा टीम बसमध्ये आला नाही, तो त्या आधीच तिथे पोहचला होता. इंग्लंडमधील आव्हानात्मक खेळपट्ट्यांसाठी आवश्यक तयारी म्हणून तो लवकर गेला होता. अर्थात, जडेजाने संघाचे हित लक्षात घेऊनच हा नियम मोडल्याचे म्हटले आहे.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत रवींद्र जडेजाने यावर स्पष्टीकरण दिले. तो म्हणाला, चेंडू नवीन असल्यामुळे मला अतिरिक्त फलंदाजीचा सराव करण्याची गरज वाटली, कारण नवीन चेंडूवर मी अधिक चांगल्या प्रकारे खेळू शकलो, तर माझे काम सोपे होईल असे मला वाटले. मी असे करण्यात यशस्वी ठरलो आणि दुपारच्या जेवणापर्यंत फलंदाजी करू शकलो. मी फलंदाजीला आलो तेव्हा संघाने पाच गडी गमावले होते. अशा स्थितीत मी संघासाठी चांगली कामगिरी करू शकलो याचे समाधान आहे.

# वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम्समध्ये जलतरणपटू मंदार दिवसेला दोन 'सुवर्ण'



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बर्मिंगहॅम (अमेरिका) येथे सुरू असलेल्या वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम्स २०२५च्या तिसऱ्या दिवशी कोल्हापूरचे जलतरणपटू मंदार दिवसे यांनी दोन सुवर्णपदके पटकावली. त्यापैकी एक पदक ४०० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात आणि पदक दुसरे ४ बाय ५० मीटर फ्रीस्टाईल रिले (पुरुष) गटामध्ये मिळविले.

दिवसे यांनी जलतरणाच्या विविध प्रकारात एकूण तीन पदके मिळविली. त्यात दोन सुवर्ण व एक रौप्यपदकाचा समावेश आहे. दिवसे यांनी यापूर्वी कॅनडा (२०२३), चीन (२०१९) आणि अमेरिका (२०१७) येथे झालेल्या वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम्समध्येही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. दिवसे हे बॉर्डर सिक्युरिटी फोर्समध्ये निरीक्षक पदावर कार्यरत असून बीएसएफच्या सेंट्रल अँक्वाटिक टीमचे मुख्य प्रशिक्षक आहेत. त्यांच्या या कामगिरीमुळे स्पर्धेत भारताचे नाव उंचावले आहे.

# टीम इंडियाचा बांगलादेश दौरा रद्द होण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा बांगलादेश दौरा रद्द होऊ शकतो. बांगलादेशातील राजकीय परिस्थिती सध्या तरी चांगली नाही. कदाचित म्हणूनच केंद्र सरकारने अद्याप भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) या दौऱ्यासाठी परवानगी दिलेली नाही. येथील खेळाडूंच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही, असे केंद्र सरकारने म्हटले आहे.

कसोटी, टी-२०मधून निवृत्त झालेले विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांना मैदानावर पाहण्यासाठी क्रिकेट चाहते उत्सुक आहेत. भारताचा बांगलादेश दौरा १७ ऑगस्टपासून सुरू होणार होता. टीम इंडिया तेथे तीन एकदिवसीय सामने आणि तीन टी-२० मालिका खेळणार होती. या मालिकेत दोघे टीम इंडियाच्या जर्सीमध्ये खेळताना दिसतील अशी क्रिकेट चाहत्यांना आशा आहे, पण आता या दौऱ्यावर संकटाचे ढग दाटू लागले आहेत.

बांगलादेशमधील सत्ताबदलानंतर तेथील वातावरण खूपच बिघडले आहे. खेळाडूंच्या सुरक्षिततेचा विचार करून केंद्र सरकार भारतीय संघाला बांगलादेश दौऱ्यावर जाऊ देणार नाही, असे मानले जात आहे. या संदर्भात लवकरच अधिकृत घोषणा केली जाऊ शकते.

याशिवाय, बीसीसीआय आणि बांगलादेश क्रिकेट बोर्ड (बीसीबी) लवकरच आगामी मालिकेबाबत मोठा निर्णय घेऊ शकतात. हा दौरा रद्द होण्याची शक्यता आहे, परंतु दोन्ही बोर्ड दौरा रद्द करण्याऐवजी काही दिवसांसाठी पुढे ढकलण्यास सहमती दर्शवू शकतात. तसे झाल्यास चाहत्यांना विराट कोहली आणि रोहित शर्मा एकदिवसीय मालिकेत खेळताना पहायला मिळतील.





















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com